७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०६० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना बड्या नेत्याची थेट मुख्यमंत्रीपदाची ऑफर

पुणे (दै. संध्या) : गेल्या काही काळापासून देशातील अनेक राज्यांच्या राजकारणात मोठे बदल पहायला मिळाले आहेत. आता राजकीय पक्षांनी उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. अशातच आता समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी मोठं विधान केले आहे. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आणि ब्रजेश पाठक यांना थेट मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली आहे. तसेच त्यांनी भाजपवरही निशाणा साधला आहे. अखिलेश यादव यांनी उत्तर प्रदेशच्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली आहे. अखिलेश यादव म्हणाले की, ‘ज्यांना उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री व्हायचे आहे त्यांनी 100 आमदार घेऊन यावे आणि मुख्यमंत्री बनावे. त्यांच्यासाठी ही एक आठवड्यासाठी ऑफर आहे. मी उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांना आधीच मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिलेली आहे. चला पुन्हा एकदा ऑफर देऊया. त्यांना यापेक्षा चांगली ऑफर मिळणार नाही.’ अखिलेश यादव हे पूर्वी फक्त केशव प्रसाद मौर्य यांना पक्षात आणण्याबाबत भाष्य करत होते.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी

मुंबई (दै. संध्या) : ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. मात्र गेल्या काही महिन्यांपासून या पैशांमध्ये अनियमितता दिसून येत आहे. आता जानेवारी महिना संपला, फेब्रुवारी महिना देखील शेवटच्या टप्प्यात आहे. मात्र असं असताना देखील लाभार्थी महिलांना अजूनही जानेवारी महिन्याचे पैसे मिळालेले नाहीत. जानेवारीचा हाफ्ता कधी मिळणार? याची प्रतिक्षा आता लाभार्थी महिला करत आहेत. या संदर्भात एक मोठी बातमी समोर येत आहे. ती म्हणजे आता लवकरच जानेवारी महिन्यांचे पैसे लाभार्थी महिलांना मिळण्याची शक्यता आहे. समोर आलेल्या माहितीनुसार जानेवारीच्या हप्त्यासाठी सरकारने फंड उभारण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या खात्यामधून 98.25 कोटी रुपये हे महिला व बालविकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे आता असा अंदाज व्यक्त केला जात आहे की, लवकरच लाडक्या बहिणींना जानेवारी महिन्याचे पैसे मिळण्याची शक्यता आहे. यामुळे लाभार्थी महिलांना मोठा दिलासा मिळू शकतो.

## १७ वर्षीय तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला

पुणे (दै. संध्या) : कोंढवा परिसरात किरकोळ वादातून १७ वर्षीय तरुणावर धारदार शस्त्राने वार करत मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून, अन्य दोघांचा शोध सुरू आहे. असिफ हिदायत शेख (वय २४, रा. कोंढवा) आणि आवेज इलियास शेख (वय २४, रा. मीठानगर, कोंढवा) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास कोंढव्यातील गल्ली क्रमांक दोनमध्ये फिर्यादी आणि त्याचा मित्र बसले होते.

# पीएम व्हायचे असेल तर मने जिंका

### देशाला माहीत आहे काँग्रेसी आधीपासूनच नागडे आहेत : मेरठमध्ये रॅपिड-मेट्रो रेल्वेचे उद्घाटन

मुंबई (दै. संध्या)



पंतप्रधान नरेंद्र मोदी एआय परिषदेतील कपडे काढून केलेल्या आंदोलनावरून काँग्रेसवर संतापले. मेरठमध्ये रविवारी एका जाहीर सभेला संबोधित करताना ते म्हणाले, भारतात जगातील सर्वात मोठी एआय परिषद झाली. संपूर्ण देश अभिमानाने भरून गेला, पण काँग्रेस आणि तिच्या इकोसिस्टमने काय केले? जागतिक कार्यक्रमाला घाणेरड्या आणि नग्न राजकारणाचा आखाडा बनवले. परदेशी पाहुण्यांसमोर काँग्रेसचे नेते कपडे काढून पोहोचले.

मी काँग्रेसवाल्यांना विचारतो, देशाला माहीत आहे की तुम्ही आधीच नागडे आहात. मग कपडे काढण्याची गरज का पडली? काँग्रेसच्या नेत्यांनी जे काही केले, ते दाखवते की देशातील सर्वात जुना पक्ष वैचारिकदृष्ट्या किती दिवाळखोर आणि दरिद्री झाला आहे.

मोदी म्हणाले, बघा दिल्लीत जे घडले, त्यात टीएमसी, डीएमके किंवा बसपाच्या लोकांनी पाप केले का... नाही केले. फक्त आणि फक्त काँग्रेसचे वेडे आणि बेलगाम नेते देशाला उद्ध्वस्त करण्यावर तुटून पडले आहेत. जर तुम्हाला पंतप्रधानपदाच्या खुर्चीवर बसायचे असेल, तर आधी तुम्हाला लोकांची मने जिंकावी लागतील.

यापूर्वी, मोदींनी मेरठ मेट्रो आणि नमो भारत रॅपिड रेलला हिरवा झेंडा दाखवला. शाळकरी मुले आणि डॉक्टरांसोबत प्रवास केला. त्यांच्याशी संवाद साधला. १२,९३० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले.

रॅपिड रेलने दिल्ली ते मेरठ हे ८२.१५ किमी अंतर केवळ ५५ मिनिटांत पूर्ण होईल. ही ट्रेन मेरठ मोदीपुरम येथून सुरू होऊन दिल्लीतील सराय काले खां पर्यंत जाईल. १३ स्थानकांवरून जाईल. संपूर्ण प्रवासात दोन स्थानके भूमिगत असतील, तर उर्वरित प्रवास उन्नत मार्गावरून (एलिवेटेड) होईल. मेट्रो बेगमपूल ते मेरठ साऊथ पर्यंत जाईल. यात ७ स्थानके तयार करण्यात आली आहेत. मेट्रोचे भाडे २० ते ६० रुपये, तर रॅपिड रेलचे भाडे २० ते २१० रुपयांपर्यंत असेल.

पंतप्रधान मोदी म्हणाले, मी काँग्रेस, सपा आणि बसपाला सांगितले होते की, आपले विषारी राजकारण सोडा आणि विकासाच्या मुद्द्यावर स्पर्धा करून पाहूया. पण, या पक्षांनी आपले विषारी राजकारण बदलले नाही. भाजपने आपल्या विकासाच्या धोरणाला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले. याचे एक उदाहरण आपली मेट्रो देखील आहे. 2014 पूर्वी म्हणजे काँग्रेस सरकारच्या काळात फक्त 5 शहरांमध्ये मेट्रो होती. आज 25 पेक्षा जास्त शहरांमध्ये मेट्रो धावू लागली आहे.

## अकोल्यात हनुमान मूर्ती प्रतिष्ठापनेत कळसावरून नोटांची उधळण

अकोला (दै. संध्या)



**भाविकांची झुंबड**

जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातल्या मनारखेड गावात हनुमान मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्यात एक अजब प्रकार पाहायला मिळाला. मंदिराच्या कळसावरून हजारो रुपयांच्या नोटांची आणि नाण्यांची उधळण करण्यात आली. त्या नोटा गोळा करण्यासाठी मात्र भाविकांची झुंबड पाहायला मिळाली. या प्रकारामुळे मोठी गर्दी झाल्याने परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याचं दिसून आलं. मनारखेड गावातील नव्याने स्थापन करण्यात आलेल्या हनुमान मूर्तीच्या प्रतिष्ठापनेनंतर हा प्रकार घडला. मंदिराच्या कळसावरून 10, 20 आणि 50 रुपयांच्या हजारो नोटा उधळण्यात आल्या. यासोबतच 5 आणि 10 रुपयांची नाणीही उधळण्यात आली. नोटांची उधळण होताच कार्यक्रमाला उपस्थित भाविकांनी त्या वेचण्यासाठी एकच झुंबड उडवली. काही जण थेट मंदिरात उभारलेल्या मंडपावर चढण्याचा प्रयत्न करत होते, तर काहीजण वाऱ्याच्या दिशेने उडणाऱ्या नोटांच्या मागे धावताना दिसले. वाऱ्यामुळे या नोटा मंदिरापासून लांबच लांब उडून गेल्याचं दिसून आलं, त्यामागे भाविकही धावताना दिसून आलं. या धावपळीत काही काळ चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, सुदैवाने कोणतीही दुर्घटना घडली नाही. या कार्यक्रमादरम्यान सुरक्षेची विशेष व्यवस्था नसल्याचेही पाहायला मिळाले. गावकऱ्यांनी या प्रकाराचे समर्थन करत, हा आमच्या भक्तीचा भाग आहे असं सांगितले. अनेक भाविकांनी वेचलेल्या नोटा आणि नाणी आपल्या घरातील देव्हाऱ्यात ठेवणार असल्याचे सांगितले. दरम्यान, सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये अशा प्रकारे नोटांची उधळण करणे योग्य आहे का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने अशा घटनांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## मंत्रालयातील प्रकाराने माझ्या प्रतिमेला डाग लागला : नरहरी झिरवाळ


मुंबई (दै. संध्या)



अन्न व औषध प्रशासन विभागात परवान्यांच्या नावाखाली मंत्रालयात सुरू असलेल्या 'कोडिंग' लाचखोरीच्या प्रकरणाने राज्यात खळबळ उडाली आहे. या गंभीर प्रकारावर स्वतः मंत्री नरहरी झिरवाळ यांनी प्रतिक्रिया दिली असून, "हा प्रकार गलिच्छ असून माझ्यासारख्या माणसाच्या प्रतिमेला यामुळे डाग लागला आहे. अशा घटना घडल्या की मानसिक त्रास होतोच" अशी खंत त्यांनी व्यक्त केली. औषध विक्रेत्यांच्या परवान्यांमध्ये त्रुटी आढळल्यास एफडीएचे इन्स्पेक्टर दुकानदारांचा परवाना निलंबित करतात. या निलंबनाविरुद्ध मंत्र्यांकडे दाद मागण्याची तरतूद आहे. मात्र, या प्रक्रियेत मंत्र्यांच्या दालनातच भ्रष्टाचार फोफावल्याचा आरोप झाला आहे. मंत्री झिरवाळांचे पीए रामदास गाडे आणि क्लर्क डेरिंगे हे खुद्द मंत्र्यांच्या अनुपस्थितीत ऐकत होते. परवाना पुन्हा सुरू करण्यासाठी कोडिंगच्या भाषेत लाखो रुपयांची मागणी केली जात असल्याचे स्टिंग ऑपरेशनमध्ये उघड झाले आहे. एका खाजगी वाहिनीने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमधून हे प्रकरण समोर आले होते.

## वाह पोलीस : स्वतःच्या गाडीला नंबर प्लेट नाही, ना डोक्यावर हेल्मेट

पुणे (दै. संध्या)



वाहतूक नियमांचे धडे देणारे आणि सामान्यांकडून दंड वसूल करणारे पोलीस स्वतःच नियमांची कशी पायमल्ली करतात, याचा एक संतापजनक प्रकार पुण्यात समोर आला आहे. पुण्याच्या मध्यवर्ती अशा अभिनव चौक, सारसबाग परिसरात एका पोलीस कर्मचाऱ्याने चक्क 'विना नंबर प्लेट', 'विना हेल्मेट' आणि आरसे नसलेल्या दुचाकीवरून सुसाट प्रवास केल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या प्रकारामुळे 'नियम फक्त सामान्यांनाच आणि पोलिसांना सगळी माफि का?' असा संतप्त सवाल पुणेकरांकडून विचारला जात आहे. व्हायरल झालेल्या या व्हिडीओमध्ये स्पष्ट दिसत आहे की, रहदारीच्या रस्त्यावरून एक पोलीस कर्मचारी (खाकी गणवेशात) आपली दुचाकी चालवत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या दुचाकीला मागची नंबर प्लेटच नाही. एवढंच नाही तर दुचाकीला दोन्ही आरसे नाहीत आणि या पोलिसाने डोक्यावर हेल्मेटही घातलेले नाही. अभिनव चौकाकडून सारसबागेच्या दिशेने जातानाचा हा प्रकार असल्याचे समोर आले आहे. या पोलीस कर्मचाऱ्याच्या मागे जाणाऱ्या एका जागरूक नागरिकाने हा सर्व प्रकार आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद केला आहे. व्हिडीओ रेकॉर्ड करताना हा नागरिक म्हणतोय, "जय महाराष्ट्र! महाराष्ट्र पोलीस आम्हाला नियम शिकवतात, पण स्वतःच्या गाड्यांना नंबर प्लेट नाही, आरसा नाही, हेल्मेट नाही... मग सामान्य नागरिकांनी काय करायचे?" या नागरिकाची ही उद्विग्न प्रतिक्रिया सध्याच्या व्यवस्थेवर आणि पोलिसांच्या दुटप्पी भूमिकेवर थेट बोट ठेवणारी आहे. सामान्य पुणेकराने चुकून जरी झेब्रा क्रॉसिंग ओलांडले किंवा हेल्मेट घातले नसेल, तर सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे काही सेकंदात त्याच्या मोबाईलवर ई-चलान धडकते. गाडीवर नंबर प्लेट नसल्यास आरटीओ आणि पोलिसांकडून दंडात्मक कारवाई केली जाते. मात्र, कायद्याचे रक्षण करणारेच जेव्हा असे भररस्त्यात खुलेआम नियम मोडतात, तेव्हा त्यांच्यावर कारवाई कोण करणार? गाडीवर नंबर प्लेटच नसल्याने या पोलिसावर ऑनलाइन दंडही कसा आकारणार? हा मोठा प्रश्न आहे. पुणे वाहतूक पोलीस या व्हायरल व्हिडीओची दखल घेऊन या बेजबाबदार पोलीस कर्मचाऱ्याचा शोध घेणार का आणि त्याच्यावर कठोर कारवाई करणार का? याकडे आता संपूर्ण पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

## राज्यसभा निवडणुकीसाठी उद्धव ठाकरेंची मोठी खेळी

### *शरद पवार गटाला वगळून थेट दिल्लीत काँग्रेसच्या हायकमांडशी चर्चा*

मुंबई (दै. संध्या)




राज्यसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमध्ये राजकीय हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. विशेष म्हणजे शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यात थेट चर्चा सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या चर्चांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला बाजूला ठेवत दोन्ही पक्षांमध्ये चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी थेट दिल्लीत काँग्रेसच्या हायकमांडशी राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चर्चा सुरू केली आहे. भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार महाराष्ट्रातील 7 राज्यसभा जागांसाठी 16 मार्च 2026 रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत विजयी होण्यासाठी एका उमेदवाराला 27 मतांचा कोटा आवश्यक आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार महाविकास आघाडीकडे 50 आमदारांचे बळ आहे. त्यामुळे सात पैकी किमान एक जागा मविआला मिळणे जवळपास निश्चित मानले जात आहे. मात्र त्या जागेवर कोणत्या पक्षाचा उमेदवार असणार यावरून आघाडीत अंतर्गत चर्चा सुरू झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार काँग्रेस आणि ठाकरे गटामध्ये केवळ राज्यसभेच्या जागांवरच नव्हे तर विधान परिषदेच्या आगामी निवडणुकांवरही चर्चा सुरू आहे. मे महिन्यात विधान परिषदेच्या 9 जागा रिक्त होणार असून त्यासाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत एका उमेदवाराला 29 मतांचा कोटा लागणार आहे. त्यामुळे या 9 पैकी किमान एक जागा महाविकास आघाडीला मिळण्याची शक्यता मानली जात आहे. महत्त्वाचे म्हणजे, या चर्चांबाबत सध्या तरी काँग्रेस आणि ठाकरे गटाने शरद पवार यांच्या गटाशी औपचारिक चर्चा केलेली नसल्याची माहिती समोर येत आहे. राज्यसभेच्या ज्या सात जागांसाठी निवडणूक होत आहे त्यामध्ये शरद पवार यांची जागाही रिक्त होत आहे. मात्र ते पुन्हा राज्यसभेवर जाणार का, किंवा पक्ष दुसऱ्या नेत्याला संधी देणार का याबाबत अद्याप स्पष्टता नाही. दरम्यान, विधानसभेतील संख्याबळ पाहता भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्या महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. त्यामुळे राज्यसभेच्या 7 पैकी सुमारे 6 जागा महायुतीच्या खात्यात जाण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

## राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांना गर्भवतींची तपासणी करावी लागणार

पुणे(दै. संध्या)



गेल्या तीन वर्षांत राज्यात जन्मजात व्यंग्य हे पहिल्या पाच प्रमुख बालमृत्यूंच्या कारणांपैकी एक म्हणून समोर आले आहे. जन्मजात व्यंगामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी व गर्भातील जन्मजात व्यंग शोधण्यासाठी ॲनॉमली स्कॅन तपासणी आवश्यक असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने जाहीर केले आहे. विभागाने सर्व खासगी रुग्णालयांना याबाबत निर्देश दिले आहेत. आरोग्य विभागाने २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ (ऑक्टोबर २०२५ पर्यंत) राज्यातील बालमृत्यूंचे विश्लेषण केले. याचा बालमृत्यू विश्लेषण व विश्लेषण अहवाल आरोग्य विभागाने तयार केला आहे. त्यानुसार, राज्यात गेल्या तीन वर्षांत जन्मजात व्यंग हे बालमृत्यूच्या पहिल्या पाच प्रमुख बालमृत्यूंच्या कारणांपैकी एक असल्याचे निष्पन्न झाले. राज्यात गेल्या तीन वर्षांत झालेल्या बालमृत्यूंपैकी सुमारे ६.५ टक्के जन्मजात व्यंगामुळे झाले आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने गर्भातील जन्मजात व्यंग तपासण्यासाठी केले जाणारे ॲनॉमली स्कॅन आवश्यक असल्याच्या सूचना केल्या आहेत.

# अजित पवारांचा मृत्यू अपघात आहे की घातपात?

मुंबई (दै. संध्या)




विजय वडेट्टीवार, भास्कर जाधव आणि आदित्य ठाकरे या तीन नेत्यांनी महाविकास आघाडीची पत्रकार परिषद घेतली. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या चहापानावर आम्ही बहिष्कार घालत आहोत अशी घोषणा केली. यावेळी विजय वडेट्टीवार यांनी अजित पवारांच्या अपघाती मृत्यूबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. अजित पवारांचा मृत्यू हा अपघात होता की घातपात होता? याबाबत सरकारने स्पष्टीकरण द्यावं अशी मागणी विजय वडेट्टीवार आणि भास्कर जाधव यांनी केली आहे. तसंच विरोधकांनी परंपरेप्रमाणे अधिवेशनाच्या आदल्या दिवशी होणाऱ्या सरकारच्या चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार घातला आहे.

“भाजपाचं घोषवाक्य होतं कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र. आज आमचा प्रश्न तोच आहे की महाराष्ट्र आज कुठे आहे? शेतकरी, सामान्य माणूस सगळे कुठे आहेत? महाराष्ट्र ड्रग्जच्या विळख्यात अडकला आहे. त्यामुळे कुठे आहे महाराष्ट्र हा प्रश्न निर्माण होतो.” राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. शासनाने फक्त दोन ओळींचं स्पष्टीकरण दिलं जातं की अपघातावर कुणीही प्रश्न निर्माण करु नये. का करु नये? हा घातपात आहे की अपघात आहे? याची देशभरात चर्चा सुरु आहे. अशा वेळी आम्ही अधिवेशनाच्या आदल्या दिवशी होणाऱ्या चहापानाला का जायचं? शेतकऱ्यांचं कंबरडं मोडणारे निर्णय सरकारने घेतले आहेत. सोयाबीन, कापूस उत्पादक या सगळ्या शेतकऱ्यांचं नव्या करारामुळे नुकसान होतंय. कापूस खरेदी निम्म्यावर आणली आहे. शेतकऱ्यांच्या संदर्भात सरकारला काळजी नाही.मका शेतकरी २४०० रुपये एमएसपी होता, महाराष्ट्रात १५०० ते १६०० रुपये दिले गेले. व्यापाऱ्यांनीही शेतकऱ्यांना जिवंतपणी मरण यातना देण्याचं काम केलं.

यवतमाळमध्ये एका महिन्यात २२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. मराठवाड्यात ७६ शेतकऱ्यांनी आयुष्य संपवलं. पोट भरलेल्या या लोकांना काहीही पडलेलं नाही. शेतकरी विरोधी सरकारच्या चहापानावर आम्ही बहिष्कार घातला आहे. असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

# शरद पवारांची प्रकृती पुन्हा बिघडली

मुंबई (दै. संध्या)



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांना पुन्हा एकदा पुण्यातल्या रूबी हॉल क्लिनिक या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. शरद पवार यांची प्रकृती मागील आठवड्यात बिघडली होती त्यांना रुग्णालयात आणण्यात आलं होतं. पण चार दिवसांनी त्यांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली. आज शरद पवार यांना पुन्हा त्रास जाणवू लागला. त्यामुळे त्यांना पुन्हा पुण्यातल्या रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. शरद पवारांच्या कन्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी एक्स या समाजमाध्यमावर पोस्ट करत याबाबतची माहिती दिली आहे. आम्ही बाबांना पुन्हा एकदा रुबी क्लिनिकमध्ये दाखल करत आहोत. त्यांच्या काही तपासण्या करण्यात येणार आहेत. तसंच त्यांना थोडा अशक्तपणा जाणवतो आहे आणि शरीरातील पाण्याची पातळी कमी झाली आहे. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात येत आहे अशी माहिती सुप्रिया सुळेंनी पोस्ट केली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, शरद पवार यांना काहीसा अशक्तपणा जाणवत आहे. त्यांच्या शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्याने त्यांना अशक्तपणा जाणवत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे रुबी हॉस्पिटलमध्ये त्यांना सलाईन लावली जाईल, अशी माहिती आहे. अशक्तपणा वगळता शरद पवार यांची प्रकृती पूर्णपणे स्थिर आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर शरद पवार हे अनेक दिवस बारामतीमध्ये होते. त्यांनी सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार यांच्या भेटीगाठी घेऊन पवार कुटुंबाला सावरण्याचा प्रयत्न केला होता.

# संपादकीय

## कनेक्टिव्हिटीची भरारी

आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर का होईना, मुंबईसह देशभरातील प्रमुख शहरांशी वाढणारी 'कनेक्टिव्हिटी' उत्तर महाराष्ट्राच्या विकासाला बळ देणारी आहे. मागील तीन महिन्यांत केंद्राने भरभरून घोषणा केल्याने आता रस्ते व रेल्वे प्रकल्पांच्या पूर्तीचे मुख्य आव्हान आहे. धर्म-अध्यात्माचा जागतिक उत्सव मानला जात असलेला कुंभमेळा नाशिकचा चेहरामोहरा बदलत असतो, हे कोणी नाकारू शकणार नाही. अर्थात, त्या बदल्यात सोशीक नाशिककरांना बऱ्याच 'कळा' सोसाव्या लागतात. सध्या त्याची साग्रसंगीत अनुभूती येत आहे. खोदकाम, धूळ आणि त्यापायी अभूतपूर्व कोंडीपासून पुढील किमान वर्षभर तरी नागरिकांची सुटका होणे शक्य नाही. या आत्यंतिक वेदना सोसल्यानंतर का होईना, ही कामे दर्जेदार आणि टिकाऊ ठरोत, एवढीच अपेक्षा नाशिककर बाळगून आहेत. मागील कुंभमेळ्यांच्या तुलनेत या खेपेला प्रस्तावित कामे व पैशांचे आकडे कित्येक पटींनी अधिक असले, तरी वेळ मात्र अत्यल्पच असल्याने एकच लगीनघाई सुरू होणे साहजिकच. या उशिराची कारणे पुन:पुन्हा उगाळत बसल्यास त्यास कदाचित नतद्रष्ट ठरवले जाऊ शकते. असो. 'रात्र थोडी, सोंगे फार' अशा परिस्थितीमुळे कामे होवोत न होवोत; परंतु या वेळच्या सिंहस्थानिमित्त लाभणारी दळणवळण साधनांची 'कनेक्टिव्हिटी' ही नाशिकला नव्या उंचीवर घेऊन जाणारी ठरू शकते. महत्त्वाचे म्हणजे, प्रस्तावित पंचवीस हजार कोटींच्या आराखड्यांपलीकडे हजारो कोटींचे रस्ते व रेल्वे प्रकल्प जाहीर करून केंद्र सरकारने महाराष्ट्र आणि त्यातही उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांवर मेहेरनजर दाखवली आहे. मागील तीन महिन्यांत चार महत्त्वाच्या दळणवळण प्रकल्पांची केवळ घोषणाच झाली नाही, तर प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाल्याने जिल्ह्याच्या विकासअनुशेषाच्या कोऱ्या पाटीवर किमान ओरखडे तरी ओढले गेले आहेत. डिसेंबरमध्ये बहुचर्चित सुरत-चेन्नई महामार्गाचा महत्त्वाचा टप्पा असलेल्या नाशिक-सोलापूर-अक्कलकोट या सहापदरी हरितक्षेत्र रस्ते प्रकल्पाला मंजुरी देऊन केंद्राने महाराष्ट्राला नववर्षाची भेट दिली. हा १९ हजार कोटींचा रस्ता पूर्ण झाल्यानंतर तो पुढे राज्याच्या हद्दीबाहेर चारपदरी चेन्नई महामार्गाला जोडला जाईल. त्यामुळे मुंबई व चेन्नई ही देशातील महत्त्वपूर्ण बंदरे थेट जोडली जातील, ज्यात वाढवणही समाविष्ट होणार असल्याने प्रमुख बंदरांचा हा सुवर्णत्रिकोण राज्य व देशाच्या उन्नतीसाठी फलदायी ठरेल. राज्याचे 'किचन' म्हटल्या जाणाऱ्या नाशिकचा कृषीमाल तिन्ही बंदरांपर्यंत भरधाव वेगात पोहोचू शकेल, हेही महत्त्वाचे! तब्बल तीन दशकांहून अधिक काळापासून प्रलंबित असलेल्या मनमाड-इंदूर रेल्वेला चाल देऊन केंद्राने दुसरा सुखद धक्का संपूर्ण उत्तर महाराष्ट्राला दिला. 'देर आये, दुरुस्त आये' या उक्तीप्रमाणे तो पूर्ण होण्याच्या आशा पल्लवित झाल्याने राजधानी मुंबई ते इंदूर हे अंतर सुमारे अडीचशे किलोमीटरने, तर पुणे ते इंदूर अंतर तीनशे किलोमीटरने कमी होईल. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि केंद्र सरकार मिळून उभारला जात असलेला मनमाड-इंदूर रेल्वेमार्ग विकासाची नवी दिशा दाखवणारा आहे. या रेल्वेमार्गाच्या उपयुक्ततेबद्दल नव्याने काथ्याकूट सुरू झाला असताना, जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्राला विकासाचा नवा आयाम दाखविणारे आणखी दोन महत्त्वाचे मार्ग मंजूर करून केंद्राने साऱ्यांनाच आश्चर्यचकित केले. उभारणीच्या टप्प्यात असलेल्या वाढवण बंदराशी नाशिकहून दुसऱ्या बाजूने 'कनेक्ट' होणाऱ्या त्र्यंबक-जव्हार-पालघर या रस्त्याच्या चौपदरीकरणाचा प्रस्ताव अखेर मार्गी लागला. वास्तविक, सिंहस्थ विकास आराखड्यात समाविष्ट असलेला हा रस्ता मागील कुंभमेळ्यापासून चर्चेत होता. मात्र, एका तपाने का होईना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक कार्य समितीने त्याची वाट सुकर केली. या प्रकल्पासाठी तत्काळ ३,३२० कोटींचा निधीसुद्धा मंजूर झाल्याने नाशिकहून त्र्यंबक-जव्हारमार्गे पालघर, मुंबई तसेच गुजरातशी सहज 'कनेक्ट' होता येईल. भूसंपादनाच्या तिढ्यामुळे सध्या चर्चेत असलेल्या बाह्य वळण रस्त्याचे महत्त्वाचे टप्पे सुद्धा वर्षभरात पूर्ण करण्यावर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचा भर राहील.

## संस्कृत सुभाषित

अतो हास्यतरं लोके किंचिदन्यन्न विद्यते
यत्र दुर्जनमित्याह, दुर्जन: सज्जनं स्वयम्॥
(आदिपर्व, अध्याय ७४, ९५ महाभारत)
स्वत: दुर्जन असणाऱ्याने सज्जनालाच दुर्जन म्हणावे, यापेक्षा हास्यास्पद गोष्ट दुसरी कुठलीच नसेल

## आगामी साप्ताहिकी

२३ फेब्रुवारी २०२६ सोमवार
संत गाडगे महाराज जयंती

२४ फेब्रुवारी २०२६ मंगळवार
दुर्गाष्टमी
जागतिक मुद्रण दिन

२५ फेब्रुवारी २०२६ बुधवार
शुभ दिवस

२६ फेब्रुवारी २०२६ गुरुवार
स्वात्रत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी
मलकुजीनाथ महाराज यात्रा – अजंती दारव्हा

२७ ऑगस्ट २०२० शुक्रवार
आमलकी एकादशी
मराठी भाषा गौरव दिन
गुलाबपुरी महाराज पुण्यतिथी – नेरपिंपळाई (अमरावती)

२८ फेब्रुवारी २०२६ शनिवार
राष्ट्रीय विज्ञान दिन

## उपदेशकथा

### रूसले कवित्व

भोजराजाची विद्वज्जनसभा खच्चून भरली होती. कवी आपल्या कविता वाचून दाखवित आपापली मते मांडीत होते. राजाही त्यात सहभागी झाला होता. तेवढ्यात द्वारपाल राजासमोर आला व त्याने लवून प्रणाम केला. बोला, काय म्हणणं आहे? राजाने विचारले. महाराज कोणी जालंदर निवासी विद्वान आपल्याला भेटण्याची इच्छा करीत आहेत, द्वारपाल नम्रपणे म्हणाला. अच्छा, जरूर आत पाठवा मग त्यांना, राजाने तत्काळ परवानगी दिली. सर्वांच्या नजरा दरवाजाकडे वळल्या. वीस–बावीस वर्षांचा एक तेजस्वी युवक दरबारात प्रवेश करीत होता. प्रत्यक्ष राजसभेत प्रवेश केल्यावर मात्र तो जरासा भांबावला. अर्थात ते साहजिकच होते. एकतर राजसभेत तो पहिल्यानेच येत होता. दुसरी गोष्ट अशी की, कालिदासासारख्या प्रतिभासंपन्न कविश्रेष्ठांच्या समोर बोलणे ही काही सामान्य गोष्ट नव्हती. शिवाय आपली आर्थिक दुरवस्था व्यक्त केल्यावर सर्वांच्या कुचेष्टाचा विषय आपण बनू की काय ही भीतीही त्याला वाटत होती. बोला, बोला ना विद्वान काहीतरी, भोजराजा म्हणाला. त्या युवकाने काही वेळ विचार केला व मग तो म्हणाला, काय सांगू महाराज, एकेकाळी माझ्या या कंठात काव्यशारदा घर करून राहिली होती ! बरं मग! राजाने विचारणा केली. पण दररोज गरमागरम कांजी प्राशन करावी लागत असल्यामुळे की काय, पोळून जाण्याच्या भीतीने तिनं तेथून पळ काढला आहे. आपल्या दारिद्र्याचे त्याने केलेले ते काव्यमन वर्णन ऐकून राजासह सर्व विद्वज्जन खूष झाले. हा युवक विलक्षण प्रतिभासंपन्न आहे हे पाहून राजाने तर कविजनांप्रमाणेच त्याचा सत्कार केला. कांजीऐवजी दररोज त्याला सुमधुर जेवण घेता यावे व काव्यशारदा परत त्याच्या कंठात विराजमान व्हावी यासाठी राजाने लक्ष मोहरा दिल्या.

कथा उपदेश : गुण ओळखणारी व त्याचे चीज करणारी माणसे असतात.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:षष्टी ०९:०९:३२ |
| २३ फेब्रुवारी २०२५ | तिथि:सप्तमी ३१:०२:२३+ |
| सोमवार | नक्षत्र:भरणी १६:३३:१९ |
| विक्रम संवत्– २०८२ | योग:ब्रह्म १०:१८:१४ |
| फाल्गुन शीर्ष शके | करण:तैतिल ०९:०९:३२ |
| संवत्– १९४७ | करण:गर २०:०६:३४ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | करण:वणिज |
| अयन– उत्तरायणारंभ | ३१:०२:२३+ |
| मास– फाल्गुन | सूर्य:कुम्भ |
| ऋतु– सौर शिशिर | चन्द्र:वृषभ२२:१२:०६ |
| शुक्ल पक्ष | हिजरी सन् – १४४६ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८६८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | | 4 | | 2 | 6 | | |
| | | | | | 6 | 3 | 7 | |
| 9 | | | | 3 | 7 | | | 8 |
| 8 | | 6 | 9 | 2 | 3 | 5 | | |
| | | | 6 | | 8 | | | |
| | | 2 | 7 | 5 | 1 | 8 | | 6 |
| 5 | | | 8 | 6 | | | | 2 |
| | 3 | 9 | 2 | | | | | |
| | | 7 | 3 | | 4 | | 6 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८६७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 8 | 5 | 3 | 1 | 7 | 4 | 9 | 2 |
| 2 | 3 | 1 | 4 | 5 | 9 | 7 | 6 | 8 |
| 4 | 7 | 9 | 8 | 6 | 2 | 3 | 1 | 5 |
| 7 | 2 | 3 | 1 | 9 | 4 | 8 | 5 | 6 |
| 1 | 4 | 6 | 5 | 2 | 8 | 9 | 7 | 3 |
| 9 | 5 | 8 | 6 | 7 | 3 | 2 | 4 | 1 |
| 5 | 9 | 4 | 2 | 8 | 6 | 1 | 3 | 7 |
| 8 | 1 | 7 | 9 | 3 | 5 | 6 | 2 | 4 |
| 3 | 6 | 2 | 7 | 4 | 1 | 5 | 8 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४५५ – गटेनबर्ग बायबलप्रकाशित पाश्चिमात्य देशांतील हे पहिले मुद्रित पुस्तक होय.
- १६६० – चार्ल्स अकरावा स्वीडनच्या राजेपदी.
- १८३६ – टेक्सासच्या सान अँटोनियो गावाच्या किल्ल्याला (अलामो) मेक्सिकन सैन्याने वेढा घातला.
- १८७० – अमेरिकन गृहयुद्ध – मिसिसिपी परत अमेरिकेत दाखल.
- १८८७ – फ्रेंच रिव्हियेरात भूकंप. २,००० ठार.
- १८९३ – रूडॉल्फ डिझेलने डिझेल इंजिनचा पेटंट मिळवला.

### राष्ट्रीय

- १९९३ – भारताने इंग्लंड विरुद्धची ३ सामन्याची मालिका ३–० ने जिंकली.
- २००८ – सर्वशिक्षा अभियानांतर्गत नागपूर महापालिकेने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला.

### जन्म

- १४१७ – पोप पॉल दुसरा यांचा जन्म.
- १६४६ – तोकुगावा त्सुनायोशी, जपानी शोगन यांचा जन्म.
- १६८५ – जॉर्ज फ्रीडरिक हान्डेल, जर्मन संगीतकार यांचा जन्म.
- १८७४ – कॉन्स्टेन्टिन पाटस, एस्टोनियाचे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
- १९४० – पीटर फोंडा, अमेरिकन अभिनेता याचा जन्म.
- १९५४ – व्हिक्टर युश्चेन्को, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- ११०० – झेझाँग, चीनी सम्राट यांचे निधन.
- १४४७ – पोप युजेनियस चौथा यांचे निधन.
- १४६४ – झेंगटाँग, चीनी सम्राट यांचे निधन.

## : SMS :

Gal's Father : I Don't want My daughter 2be spending Her Entire Life wit an IDIOT'
Boyfrnd : Thats Why I Want 2 Take Her away From U..! Think Smart..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.८ | २२.२ |
| अहमदनगर | २९.६ | २१ |
| अकोला | ३३ | २३.३ |
| अमरावती | ३१.४ | २२.६ |
| बीड | ३४.४ | २१.७ |
| भंडारा | ३१.९ | १८.४ |
| बुलढाणा | २६.१ | १३.३ |
| चंद्रपूर | ३४.३ | २१.६ |
| चेन्नई | ३४.४ | २२.१ |
| नवी दिल्ली | २६.२ | १५.९ |
| धुळे | ३२.६ | २२.९ |
| गोंदिया | ३१ | १७.८ |
| जळगाव | ३३ | २२.६ |
| कोल्हापूर | ३१.५ | २०.३ |
| लातूर | ३१.२ | २०.६ |
| मुंबई | ३४.३ | २६.२ |
| नागपूर | ३०.५ | १८.८ |
| नांदेड | ३२.७ | २१.५ |
| नंदूरबार | ३१ | २३.५ |
| नाशिक | ३०.७ | २१.१ |
| पुणे | २९.८ | २१ |
| पंढरपूर | ३१.६ | २१.९ |
| सातारा | ३१.८ | १९.५ |
| सांगली | ३२.७ | २०.८ |
| सोलापूर | ३२.५ | २२.९ |
| वर्धा | ३३.३ | २१.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व जमीन, वहान, मशनरी संबंधीत चांगले योग आहेत. परिवारात वाद करू नका.

**तुळ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. मदतीची अपेक्षा करू नका.

**वृषभ :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा.

**मिथुन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील. संत लोकांचा सहवास लाभेल.

**धनु :** शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा:दक्षिण सामान्य स्तरावरचे कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कर्क :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील. बाहेरच्या लोकांमुळे फायदा होईल.

**मकर :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे.


**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राही. कौटुंबिक समस्या हल होतील. आपल्या वाईट व्यसनांपासून दूर रहा.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल.

**कन्या :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा:दक्षिण एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे आपल्या जीवनात बदल घडून येईल. जीवनसाथी बरोबर प्रेमळपणे वागा.

**मीन :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६८



### आडवे शब्द

१. न्याहरी, नाश्ता
४. हिंमतीची हद्द
७. एकदम योग्य
११. हरिवंशराय बच्चन याची प्रसिद्ध कविता– 'लहरों से डरकर नौका पार नहीं होती, कोशिश करनेवालों की -- नहीं होती!
१२. ग्रामीण बोलीत गौर
१३. पावा
१४. शंभरी गाठणारा
१७. जोरात कोसळणे–ओतणे
१९. मोहिनी, अंमल
२१. खंडाने शेती करणारा
२२. पहारा
२४. काव्यात कोण
२५. वाकलेला
२६. वाल्याचा वाल्मिकी करणारा मंत्र
२७. झूल घेतलेला
२९. अनुतीर्ण
३१. पोहणे, तरंगणे
३२. गुलाबजामुनचा रस
३३. नेटका
३५. मनीमाऊचे वाघोबाशी नाते
३७. भानगड
३८. राजाची आई
३९. संभवमि युगेयुगे'चे आश्वासन देणारा अवतार
४२. च्या पुढे, च्या समक्ष
४४. शेतकऱ्याला दिलेले कर्ज
४५. विक्रमवीर सचिनचे वडील
४७. मासा
४९. माफी
५०. अलिप्त
५२. राबता, जाणे–येणे
५३. एकरूप, एकतान
५६. लोकहित
५७. श्रीयुत, श्रीमान
५९. किंमत
६१. मदनाची सहचरी
६२. यमनगरी
६३. घड्याळाचा आवाज
६५. अमंगल जाळण्याचा सण
६६. रसभंग, विचका
६८. तलवारीचे घर
७०. अंत:करण
७२. रामचरित मानस लिहिणारे
७४. खास अ.नगरकडील
७६. संगोपन– --- पोषण
७७. आश्चर्य, ७९. जोरदार
८०. सुबक, कोरून काढलेला
८१. शिवशाहीतील प्रमुख शस्त्र

### उभे शब्द

१. दुश्चिन्ह
२. पापणी (हिदी)
३. शुष्कता
४. शक्तीमान, पराक्रमी
५. त्वरेने, वेगाने
७. खवलेले खोबरे
८. दूरदेश
९. लुच्चा, खोटा
१०. लहानसहान
१५. शिव्याशाप
१६. लढतना आलेले मरण
१८. जर्दाळूचे बी
२०. पैंजणांचा नाजूक आवाज
२३. बळीला पाताळात गाडणारा
२४. उणीव
२६. धान्याचा ढीग
२८. कपाळ फुटणे
३०. च्या जवळ
३२. दररोजचा, परिपाठातला
३४. निष्णात, वाकबगार
३५. आईचा भाऊ
३६. तहान
३७. द्राक्षाचा वा मोत्यांचा आणि फुलांचाही
३९. अशक्त, बारीक
४०. निरूपयोगी भटकंती
४१. पत्त्यातील पाच–तीन–दोन
४३. श्रीविष्णू
४६. कष्टाळू
४८. मऊ
५१. रायगडवरील एक कडा
५२. प्रत्येक संसारी माणसाची अवस्था याच्याप्रमाणे असते!
५४. तृष्णा
५५. नवऱ्याचा भाऊ
५६. चकचकीत, --- बरक
५८. लज्जित, वरमलेला
५९. मध्यंतरी
६०. गर्दी
६१अ. पण
६५. शिवकालीन नाणे
६७. जहाज
६९. रोकड
७१. प्रहार, वार
७३. वारा
७५. कागदाचे परिमाण
७७. नूतन
७८. संघर्ष, प्रतिकार

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८६७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रेल्वे इंजिन ५.अंतरिक्षयान ९.गरगरीत १०.क्षमस्व ११.तीर १३.पार १४.छायाचित्र १६.यथार्थ १७.तगमग १९.चव २१.पात २२.सामान २४.सकटनिकट २७.गौरकाय २८.कावा ३०.महारथी ३२.आपादमस्तक ३५.जवळ ३७.लव ३८.अतोनात ४०.महाराज ४२.नाचा ४३.फटाका ४४.तर ४५.नव ४७.सलग ४९.नीरमोर ५३.कसर ५४.मातापिता ५५.अपमान ५६.रद ५७.आज ५७अ.कळवळा ५८.वड ५९.गाणे ६०.अवघड ६१.यंदा ६२.कातणे ६३.साय ६४.परकर ६५.खात्रीशीर ६७.टर ६८.फारकत ७०.भाक ७१.कंज ७२.कणेकर ७३.दशानन ७४.अजीत

उभे उत्तर : १.रेवती २.इंद्र ३.नगर ४.रागरंग ५.अंतरंग ६.क्षमायाचक ७.नक्षत्र ८.अस्वल १२.रयत १३.पार्थसारथी १५.चिवट १७.तनय १८.मक्षिकापात २०.भोक २१.पालम २३.माका २४.समस्त २५.निलाजरा २६.टवाळ २७.गौरव २९.वाद ३१.हालचाल ३२.आनाकानी करणे ३३.मधुकर ३४.कमतरता ३६.वजन ३८.अफलातून ३९.तोटा ४१.हार ४२.नासका ४६.वर्तावळा ४८.गळी पडणे ५०.रसद ५१.मोर ५२.पाताळयंत्री ५४.माजघर ५४अ.पिक ५५.अवतरणे ५७.आवक ५९.गायक ६०.अरविंद ६२.काटक ६३.सार ६५.खाक ६५अ.शिकंजी ६६.रजत ६८.फार ६९.तप ७०.भान

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### श्री साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : सोमवार पेठ माळी महाराज मठा शेजारी धायरकर वाडा येथे श्री साईबाबा मंदिराचा 26 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला सकाळी श्रींची काकड आरती नगारा वादन गणपती पूजन पुष्य वचन नवग्रह पूजन गुरु पूजन दत्तयाग साई सत्यनारायण पूजन. श्रींची शेजारती असे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी लुई अंध-अपंग कल्याण संस्था यांच्या वतीने आज की शाम साई के नाम या मधुर संगीत कार्यक्रमाने समारोप झाला. यावेळी मंदिराचे पुजारी राजेंद्र धायरकर. स्वप्निल धायरकर, अभिजीत धायरकर, सुरेखा धायरकर, पुनम बरके, भाग्यश्री धायरकर, नगरसेविका कल्पना बहिरट, राजेंद्र रासकर, किरण रासकर, ओंकार भोजने, अमोल बनकर, सनी गायकवाड, आर्यन बरके, आदेश बरके, श्रवण कोल्हे, आर्य धायरकर, पूर्वा कोल्हे, शालन भोजने, आरोही धायरकर, अन्वी धायकर, सनी जाधव, विशाल बुरडे, अमोल बनकर, अमोल लडकत आदि यावेळी उपस्थित होते.



### रेड जायंट मूव्हीजच्या 'KHxRK'मुळे 47 वर्षांनंतर कमल हासन आणि रजनीकांत एकत्र

पुणे (दैनिक संध्या) : रेड जायंट मूव्हीजच्या आगामी चित्रपट 'KHxRK' मुळे भारतीय चित्रपटसृष्टी एक ऐतिहासिक क्षण अनुभवणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून भारतीय सिनेमातील दोन सर्वात मोठे आणि प्रतिष्ठित दिग्गज कमल हासन आणि रजनीकांत, तब्बल 47 वर्षांनंतर पुन्हा एकत्र पडद्यावर झळकणार आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे या दोन्ही महान कलाकारांनी शेवटचे एकत्र काम 1970 च्या दशकात केले होते. जवळपास पाच दशकांनंतर त्यांचे पुन्हा एकत्र येणे हे भारतीय चित्रपट इतिहासातील अत्यंत महत्त्वाच्या घटनांपैकी एक मानले जात आहे. कारण हा चित्रपट अशा दोन वारशांचा संगम आहे, ज्यांनी केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावरही पिढ्यान्‌पिढ्या प्रेक्षकांवर खोल प्रभाव टाकला आहे. सध्या या चित्रपटाची निर्मिती रेड जायंट मूव्हीज करत आहे. या दोन सिनेमाई दिग्गजांना एकत्र आणण्याचे स्वप्न या प्रोडक्शन हाऊसने साकार केले आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाकडे भव्यता, वारसा आणि उत्कृष्ट कथाकथनाचा उत्सव म्हणून पाहिले जात आहे. या ऐतिहासिक क्षणाबद्दल रेड जायंट मूव्हीजच्या एका प्रवक्त्याने सांगितले, "कमल हासन सर आणि रजनीकांत सर यांना या चित्रपटासाठी एकत्र आणणे हे आमच्यासाठी स्वप्नपूर्तीप्रमाणे आहे. या ऐतिहासिक क्षणाचा भाग होण्याचा आम्हाला अभिमान, कृतज्ञता आणि प्रचंड उत्साह वाटतो. हा भारतीय सिनेमासाठी भावनिक आणि ऐतिहासिक क्षण आहे. त्यांच्या अतुलनीय योगदानाचा आणि वारशाचा सर्वोत्तम पद्धतीने सन्मान करणे, हाच आमचा उद्देश आहे." या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक नेल्सन दिलीपकुमार करत आहेत. त्यांनी नुकत्याच आलेल्या ब्लॉकबस्टर जेलर मुळे प्रचंड यश मिळवत स्वतःला देशातील आघाडीच्या कमर्शियल दिग्दर्शकांमध्ये स्थान मिळवून दिले आहे. चित्रपटाचे संगीत सुप्रसिद्ध संगीतकार अनिरुद्ध रविचंदर यांनी दिले आहे, ज्यांचे संगीत अनेक ब्लॉकबस्टर चित्रपटांना नव्या उंचीवर घेऊन गेले आहे. कमल हासन आणि रजनीकांत यांच्या दमदार अभिनयाने सजलेला 'KHxRK' हा चित्रपट तमिळ, तेलुगू आणि हिंदी अशा तीन भाषांमध्ये भव्य स्वरूपात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाशी संबंधित इतर तपशील सध्या गुप्त ठेवण्यात आले असून, योग्य वेळी अधिकृतरीत्या जाहीर केले जातील. मात्र एवढे निश्चित आहे की 'KHxRK' भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात एक अविस्मरणीय अध्याय जोडणार आहे.



### महाराष्ट्रात 'लव्ह जिहाद आणि अवैध धर्मांतर विरोधी' कायदा तात्काळ करा !

पुणे (दैनिक संध्या) : गेल्या दोन वर्षांपासून संपूर्ण महाराष्ट्रात 'लव्ह जिहाद' आणि 'अवैध धर्मांतर' या गंभीर समस्यांविरोधात कायदा करण्यासाठी हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी जनआक्रोश मोर्चे काढले. त्यावेळी सरकारने या विषयाचे गांभीर्य ओळखून 'लव्ह जिहाद' विरोधात कठोर कायदा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आजही दुर्दैवाने या घटना थांबलेल्या नाहीत, उलट त्यांची तीव्रता आणि क्रूरता वाढतच चालली आहे. आता सरकारने दिलेले आश्वासन पूर्ण करण्याची वेळ आली आहे. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांप्रमाणे गुन्हेगाराला जन्मठेप शिक्षा देणारा कठोर आणि अजामीनपात्र स्वरूपाचा 'लव्ह जिहाद' व अवैध धर्मांतर विरोधी कायदा' येत्या अधिवेशनात तात्काळ संमत करावा अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने राज्यशासनाकडे केली आहे. या दृष्टीने समितीने मा. मुख्यमंत्री, मा. गृहमंत्री यांच्याकडे राज्यभरातील विविध जिल्ह्यातील एकूण ७५ हून अधिक ठिकाणी स्थानिक जिल्हा आणि तालुका प्रशासन तसेच स्थानिक लोकप्रतीनिधींमार्फत निवेदने दिली. पुणे जिल्ह्यांतही मध्ये मोठ्या संख्येने महिला व हिंदुत्वनिष्ठांनी एकत्रित येत निवेदनाच्या मार्फत वरील मागण्या केल्या आहेत. पुणे जिल्ह्यात लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला निवेदने देण्यात आली. आमदार भीमराव तापकीर यांच्या कार्यालयात समितीच्या वतीने निवेदन देऊन या विषयाचे गांभीर्य मांडण्यात आले. तळेगाव दाभाडे नगरपरिषद श्री. संतोष दाभाडे यांना निवेदन देण्यात आले. निवेदन स्वीकारताना त्यांनी या विषयाचे समर्थन करत सांगितले की, "आजच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सांस्कृतिक मंत्री यांना या संदर्भात मेल (ईमेल) पाठवून या मागणीचा पाठपुरावा करणार आहे."

# पुण्यात एकाच वेळी ४२ ठिकाणी जल स्वच्छता मोहीम संपन्न

## जल संवर्धनाच्या दिशेने संत निरंकारी मिशनचे पुण्यामध्ये विशाल स्वच्छता अभियान संपन्न



पुणे (दै. संध्या) :

जेव्हा सेवा हीच साधना ठरते आणि निसर्गाविषयी संवेदनशीलता जीवनाचा मूलमंत्र बनते, तेव्हा समाजाला नवी दिशा देणारे पवित्र संकल्प जन्माला येतात. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे आयोजन रविवार, 22 फेब्रुवारी 2026, सकाळी 8 ते 11 वाजेपर्यंत, परम श्रद्धेय सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज एवं निरंकारी राजपिता रमीत जी यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी राबविण्यात आले.

या अभियाना अंतर्गत पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी, मुळा, मुठा, भीमा, भामा, घोडनदी, पवना, वेळू, कुकरी, मिना, कऱ्हा, मांडवी, आनंदी या नद्यांसह शहरातील विविध तलाव अशा ४२ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली. या अभियानांतर्गत पुण्यामध्ये मुळा मुठा नदीच्या विविध घाटांवर विशाल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

संत निरंकारी मंडळाचे नंदकुमार झांबरे यांनी माहिती देताना सांगितले की, हा विशाल उपक्रम देशभरातील 1600 हून अधिक ठिकाणी तसेच पुण्यामध्ये ४२ ठिकाणी एकाच वेळी या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

पाणी हे केवळ एक साधन नसून जीवनाचा आधार आणि ईश्वराची अमूल्य देणगी आहे त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे हि जागृती समाजामध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. संत निरंकारी मिशनने बाबा हरदेव सिंह जी यांच्या प्रेरणादायी शिकवणी आत्मसात करून सन 2023 मध्ये संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने 'प्रोजेक्ट अमृत'ची सुरुवात केली होती. जलसंवर्धन हा उपक्रम केवळ एखाद्या दिवसापुरता किंवा मर्यादित मोहिमेपुरता न ठेवता, तो एक जीवनशैली, संस्कार आणि सेवाभाव म्हणून स्वीकारण्याची प्रेरणा बनेल. जिथे स्वच्छ जलातून स्वच्छ मन आणि स्वच्छ समाज घडू शकेल. सतगुरु माताजींचा संदेश सदैव हाच राहिला आहे की, आपण ही पृथ्वी पुढील पिढ्यांसाठी अधिक सुंदर, स्वच्छ आणि संतुलित स्वरूपात जपून ठेवली पाहिजे. 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' हे अभियान त्या पवित्र संकल्पाचे मूर्त स्वरूप आहे, जे समाजाला निसर्ग, समाज व आत्म्याशी जोडून करुणा, समतोल आणि सौहार्दपूर्ण भविष्याच्या दिशेने पुढे नेण्याचे काम करेल. स्वछता अभियान संपन्न झाल्यानंतर त्याच ठिकाणी विशाल सत्संग चे देखील आयोजन करण्यात आले होते . त्यामधून बाहेरील स्वच्छतेबरोबरच मनाच्या आंतरिक शुद्धीचा संदेश आध्यात्मिक विचारधारेतून देण्यात आला.

## 'परिवर्तन २०२६' सोहळ्यास उत्फुर्त प्रतिसाद



पुणे (दै. संध्या) :

ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल (BBNG) तर्फे आयोजित वार्षिक बिझनेस कॉन्क्लेव्ह 'परिवर्तन २०२६' हा नुकताच वाकड येथील हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल येथे दिमाखात पार पडला. देश-विदेशातील १२०० हून अधिक ब्राह्मण उद्योजकांनी या मेगा संमेलनात सहभाग नोंदवत नेटवर्किंग, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचा नवा विक्रम प्रस्थापित केला. ब्राह्मण समाजातील उद्योजक, उद्योगपती व व्यावसायिकांना एकत्र आणून परस्पर सहकार्याची मजबूत साखळी निर्माण करणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश होता. दोन दिवसीय कार्यक्रमात पॅनेल चर्चासत्रे, प्रेरणादायी व्याख्याने, फायरसाईड चॅट्स, बी-टू-बी कॉन्क्लेव्ह, पॉवरपॉईंट सादरीकरणे व परस्परसंवादी सत्रांचा समावेश होता. 'परिवर्तन'चे कॅप्टन श्री. नंदन गुमास्ते यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाला अखिल भारतीय संत समितीचे महासचिव परमपूज्य स्वामी जितेंद्रानंद सरस्वती, राज्यसभेच्या सदस्या डॉ. मेधा कुलकर्णी, कामत हॉटेल्स समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. विठ्ठल व्यंकटेश कामत, उद्योगपती श्री. प्रकाश भालेराव आणि श्री. उदय निरगुडकर यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते BBNG स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले तसेच प्रायोजकांचा सन्मान करण्यात आला. पीएनजी ज्वेलर्स, पितांबरी ग्रुप आणि चितळे बंधू मिठाईवाले यांनी प्रायोजकत्व देत कार्यक्रमाला बळकटी दिली. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात भारतातील उद्योजकतेच्या संधींवर प्रकाश टाकत ब्राह्मण व्यावसायिक समुदायाच्या एकत्रीकरणावर भर दिला.

## शिवजयंतीनिमित्त यशवंत फाउंडेशनकडून माढयातील शाळांमध्ये वह्या व चरित्रपर पुस्तकांचे वाटप

पुणे (दै. संध्या) :

छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त माढ्यातील यशवंत फाउंडेशनने शहरातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य व वह्यांचे वाटप केले.

शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची शाळा, मुलांची शाळा क्रमांक दोन व उर्दू शाळा या शाळांमध्ये यशवंत फाउंडेशनने शैक्षणिक साहित्य व वह्यांचे वाटप केले. महापुरुषांच्या चरित्राची शंभर पुस्तके भेट म्हणून दिली.

यावेळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष देविदास खरात, संतोष जुगदार, सहायक पोलिस निरीक्षक रोहित शिंदे, संभाजी ब्रिगेड प्रदेश कार्यकारिणी सदस्य दिनेश जगदाळे उपस्थित होते.

प्रास्ताविक मुख्याध्यापक सुरेश माळी यांनी केले. वह्यांचे वाटपप्रसंगी देविदास खरात, डॉ. यू. एफ. जानराव, गणेश मोरे, बापू राऊत, दत्तात्रय राऊत, शिवाजी माने, किरण पवार, रवी सरवदे, उपस्थित होते. सूत्रसंचालन विनोद परिचारक यांनी केले.

## बांधकामांच्या धुळीत गुदमरतेय पुणे; प्रशासन मात्र मौनात

पुणे (दै. संध्या) :

शहर अक्षरशः खोदकामांच्या खड्ड्यांत गाडले गेले आहे. एकीकडे उखडलेले रस्ते; दुसरीकडे आकाशाला भिडणाऱ्या टोलेजंग इमारती आणि या सर्वांमध्ये अडकला आहे तो पुणेकर! खासगी प्रकल्प, महापालिका, मेट्रो आणि विविध शासकीय विभागांकडून तब्बल १० कोटी ९० लाख चौरस फुटांवर धडाधड बांधकामे सुरू आहेत. त्यात अनधिकृत बांधकामांचा तर कुठे हिशेबही नाही. प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांना उघडपणे हरताळ फासून केवळ सिमेंट-विटांच्या साम्राज्याची स्पर्धा रंगली आहे. परिणामी हवेत धूलिकणांचे प्रचंड ढग दाटले असून, अक्षरशा धुरकट वातावरणात नागरिकांचा श्वास गुदमरत आहे. हे सर्व होत असताना प्रशासन आणि लोकप्रतिनिधी मात्र मौन बाळगून आहेत.

शहरात सुरू असलेल्या महापालिकेच्या प्रकल्पांचे बांधकाम करतानाही धुळीचे प्रमाण रोखण्यासाठी कोणत्याही उपाययोजना केलेल्या दिसत नाहीत. याचे उदाहरण घ्यायचे झालेच तर कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम तब्बल ८ वर्षांपासून रखडलेले आहे. हे काम अर्धवट असल्याने परिसरातील नागरिकांना धुळीचा त्रास होतो. रस्त्याच्या कडेची घरे, दुकानांमध्ये धूळ जाते. हॉटेल, छोट्या उपाहार गृहांमध्येही धूळ जात असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

बांधकाम करताना सुरक्षेची पुरेशी काळजी घेतली जात नसल्याने सिमेंट, खडी, तुटलेल्या विटा या रस्त्यावर पडून लोकांच्या जिवाला धोका निर्माण होत आहे. तसेच जुन्या इमारती पाडताना प्रचंड प्रमाणात धूळ उडून परिसरातील सोसायटी, घरांमध्ये जात आहे. नियमावलीचे तंतोतंत पालन करण्यास बांधकाम व्यावसायिक दुर्लक्ष करत आहेत.

## VISTA 2K26 दुअथलॉन व मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### १००० हून अधिक स्पर्धकांचा सहभाग

पुणे (दै. संध्या) :

साईबालाजी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स यांच्या वतीने आयोजित VISTA 2K26 – द ऑलिम्पिक डिस्टन्स दुअथलॉन व मॅरेथॉन स्पर्धेला स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हिंजवडी येथील मेझ्झा ९ येथे पहाटे ६.३० वाजल्यापासून सुरू झालेल्या या क्रीडा महोत्सवात तब्बल १००० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवत कार्यक्रमाला मोठे यश मिळवून दिले. महाविद्यालयीन फेस्टमध्ये आयोजित करण्यात आलेली ही ऑलिम्पिक डिस्टन्स दुअथलॉन स्पर्धा विशेष ठरली. स्पर्धेत ५ किमी धावणे, ४० किमी सायकलिंग आणि १० किमी धावणे असे तीन आव्हानात्मक टप्पे होते. याशिवाय ५ किमी व १० किमी मॅरेथॉन आणि साईबालाजी पब्लिक स्कूलच्या सहकार्याने १.५ किमी 'फन रन'चेही आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे अत्याधुनिक आरएफआयडी ट्रॅकिंग प्रणालीचा वापर. प्रत्येक स्पर्धकाच्या बिबवर आरएफआयडी चिप बसविण्यात आल्यामुळे धावपट्टूंची सुरुवात, प्रत्येक टप्प्यावरील वेळ आणि अंतिम वेळ अचूकपणे नोंदवली गेली. त्यामुळे मानवी चुका टळल्या आणि निकाल प्रक्रिया जलद व पारदर्शक झाली. सहभागी स्पर्धकांना अधिकृत बिब टाइम सर्टिफिकेटही देण्यात आले.

> या स्पर्धेच्या यशामुळे साईबालाजी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सने उत्कृष्ट आयोजन क्षमता पुन्हा सिद्ध केली असून पुण्यातील क्रीडा संस्कृतीला नवी उभारी मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



डुअथलॉन विजेते पुरुष गटामध्ये १) सपान पांचाळ, ईश्वर पाटील, क्षेतमयूम कबिदाश तर डुअथलॉन विजेते महिलामध्ये १) ऐश्वर्या दुधाडे, २) साक्षी पांडे, ३) किरणाक्षी राजपूत यांनी आपली मोहोर उमटवली

विद्यार्थी, व्यावसायिक खेळाडू, आयटी क्षेत्रातील कर्मचारी आणि फिटनेसप्रेमी नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. विजेत्या स्पर्धकांना आकर्षक रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवकांमध्ये फिटनेस, शिस्त, सहनशक्ती आणि समुदाय सहभागाची भावना निर्माण करणे हा असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडल्याबद्दल सर्व सहभागी, स्वयंसेवक आणि सहकार्य करणाऱ्या संस्थांचे आयोजकांनी आभार मानले.

संस्थापक अध्यक्ष प्रा. मनीष मुंदडा यांनी सांगितले की, "डुअथलॉन हा केवळ क्रीडा उपक्रम नसून युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी व्यासपीठ आहे. भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे समाजात आरोग्य व फिटनेसविषयी जागरूकता निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न राहील." सचिव प्रा. निरूपमा मुंदडा यांनी विजेत्यांचे अभिनंदन करत आयोजकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

# भाषा अनुवादामुळे दोन संस्कृतींमध्ये सुसंवाद आणि आदराची भावना

### डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके



पुणे (दै. संध्या) :

भारत हा विविध भाषांचा, संस्कृतींचा आणि परंपरांचा देश आहे. "कोसाकोसावर पाणी बदले, तीन कोसावर वाणी", असं म्हणतात. प्रत्येक राज्याची भाषा, पोशाख, खाद्यसंस्कृती वेगळी असली, तरी "भारतीय" ही ओळख आपल्याला एकत्र बांधून ठेवते. या एकात्मतेला बळ देणारं एक महत्त्वाचं साधन म्हणजे अनुवाद. केवळ एका भाषेतील शब्द दुसऱ्या भाषेत मांडत भाषांतील अंतर दूर करणं म्हणजे अनुवाद नव्हे. तो दोन संस्कृतींमध्ये संवाद घडवणारा सेतू आहे. एका भाषेतील विचार, भावना, परंपरा आणि मूल्य दुसऱ्या भाषिक समाजापर्यंत पोहोचवण्याचं कार्य अनुवाद करतो. त्यामुळे परस्पर समज, सहानुभूती आणि आदर निर्माण होतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ अनुवादक डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सुरु झालेल्या आठव्या राष्ट्रभक्ती साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरुन त्या बोलत होत्या. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्येष्ठ अनुवादक डॉ. रवींद्र गुर्जर, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचे कार्यवाह डॉ. अविनाश चाफेकर, ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकांत शहासने व संयोजिका तेजाली शहासने आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. "अनुवादातून राष्ट्रभक्ती" या संकल्पनेला वाहिलेले हे संमेलन फिरोदिया ऑडिटोरियम, फर्ग्युसन महाविद्यालय येथे सुरु आहे.

राष्ट्रनिर्मितीसाठी अनुवाद या विषयावर पुढे बोलतांना फडके म्हणाल्या की, आपल्या देशाप्रति निष्ठा व्यक्त करण्यासाठी जी प्रतिज्ञा सर्व शाळांमध्ये म्हटली जाते, ती तिथल्या राज्यभाषेनुरूप. भाषा बदलली तरी आशय बदलत नाही. राष्ट्रनिष्ठेची भावना तीव्रपणे जागृत होते आणि जागरूकतेने जोपासली जाते. ही प्रतिज्ञा जरी तेलुगु भाषेत लिहिली गेली असली, तरी तिचा अनुवाद मराठी, हिंदी, इंग्लिश, गुजराती, बंगाली आणि पंजाबी या सहा भाषांत करण्यात आला. अवघ्या साठ-सत्तर शब्दांत राष्ट्रप्रेम जागवण्याची ही किमया केवळ अनुवादाने साध्य झाली आणि त्यामुळेच "राष्ट्रजोडणी" हाच या वर्षीच्या "राष्ट्रभक्ती साहित्य संमेलना" चा प्रमुख विषय ठेवण्यात आला आहे, आज संमेलनाच्या पहिल्या दिवशी अनुवादविषयक व्याख्यानांमध्ये डॉ. प्रांजली देशपांडे यांनी कृत्रिम बुध्दीमत्ता आणि अनुवाद, भारत प्रेस परिषदेचे अधिकारी हर्षल आकुडे यांनी प्रशासकीय सेवेतील अनुवादाच्या संधी, सुश्रुत कुलकर्णी यांनी क्रांतीकारक साधने तर दीपक झेमसे यांनी पेटंट व शास्त्रीय अनुवाद या विषयावर मार्गदर्शन केले. भाषासौष्ठव जपताना त्यातील अनुवादातील खाचाखोचा या विषयावर विदुला टोकेकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी, रविवारी (22 फेब्रुवारी) मराठी भाषेच्या जतनासाठी आपले आयुष्य समर्पण करणाऱ्या ज्येष्ठ मराठी व्याकरण तज्ञ प्रा. यास्मिन शेख यांना शिक्षणप्रेमी शांतारामशेठ शहासने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तर महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचे कार्यवाह डॉ. अविनाश चाफेकर यांना कवयित्री उर्मिलाताई कराड जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच ओळख देशभक्तांची या उपक्रमाचा संकल्पपूर्ती समारंभ लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटीचे अध्यक्ष किरण ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे विवेक भोसले, पर्यावरणप्रेमी डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील, मराठीकाका अनिल गोरे उपस्थित राहणार आहेत.

रजि. नं. पी एन ए/जे एन आर/(सी आरं) ४४३/८८-८९ रजि.दिः-६-६-१९८९

।। सहकारातून समृद्धीकडे ।।

# शिवशक्ती नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जुन्नर.

**मुख्य कार्यालय :** सदाबाजार/मंगळवारपेठ, जुन्नर. ४१०५०२. (पुणे) ☎ :-( ०२१३२-२९५३६६) शाखा नं. १ :-धान्यबाजार पेठ, जुन्नर ता. जुन्नर फोन नं ०२१३२-२२३११४ शाखा नं. २ :- माणिक चौक, चाकण, ता. खेड, जि. पुणे फोन नं.०२१३५-२४९१०६

जावक क्र. :- ९२/२०२६ दिनांक :- २१/०२/२०२६

## जाहीर लिलाव नोटीस

पुणे जिल्ह्यातील सर्व लोकांना कळविण्यात येते की, खालील नागरीकांनी सोनेतारण कर्ज घेतलेले आहे. सदर कर्जाची मुदत संपलेली असून त्यांना त्याबाबत कळविण्यात आले आहे. तरी अद्याप त्यांनी सदर सोनेतारण कर्ज व त्यावरील व्याज भरलेले नाही म्हणुन संस्थेने सोने-तारण कर्जवसुलीसाठी सदर सोन्याचा लिलावाने विक्री करण्याचा ठराव केला आहे. सदर सोने तारण लिलाव **शुक्रवार दि. २७/०३/२०२६** रोजी **दुपारी १.००** वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात होईल व लिलावाने विकून आलेली रक्कम कर्जदाराचे कर्जात भरली जाईल व कमी पडलेली रक्कम कर्जदाराकडून वसूल केली जाईल. रक्कम शिल्लक राहील्यास कर्जदाराचे बचत खात्यात ठेवण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

| मुख्य शाखा | | |
|---|---|---|
| अ. क्र. | खाते क्र. | नाव |
| जि.ए.चे.नाव : सोनेतारण कर्ज | | |
| १ | २०३१७५३ | उलफतजहेरा इरफान हुसेन सय्यद<br>मु. पो. सय्यद वाडा जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| २ | २०३१७७८ | नफीसा निजाम बेग<br>मु. पो. शिपाई मोहल्ला जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ३ | २०३१८२४ | सईदा इम्तियाज सय्यद<br>मु. पो. शुक्रवार पेठ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ४ | २०३१८७२ | संतोष मारुती शेटे<br>मु. सुराळे, पो. खानगाव, जुन्नर |
| ५ | २०३१८७६ | योगेश मनोहर भुजबळ<br>मु. पो. कुमशेत ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ६ | २०३१९०५ | विष्णू नामदेव वर्पे<br>मु. पो. धामणखेल ता. जुन्नर, जुन्नर |
| ७ | २०३१९४१ | रेश्मा अनिल पंडित<br>मु. पो. कुंभारआळी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ८ | २०३१९९७ | फिरोज नजीर हलवाई<br>मंगळवार पेठ मु. पो. ता. जुन्नर जि. पुणे. जुन्नर |
| ९ | २०३२००९ | शबनमबानो इमरान खान<br>मु. पो. खलील पुरा पेठ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| १० | २०३२०१८ | नौशादबी नबी बेपारी<br>मु. पो. पणसुंबा पेठ जुन्नर ता. जुन्नर जुन्नर |
| ११ | २०३२०२० | रजिया गणी शेख<br>मु. माही मोहल्ला जुन्नर जुन्नर |
| १२ | २०३२०२५ | सोमनाथ विठ्ठल सौदंडे<br>मु. पो. शिरोली बु. ता. जुन्नर जि. पुणे जुन्नर |
| १३ | २०३२०५७ | नौशादबी नबी बेपारी<br>मु. पो. पणसुंबा पेठ जुन्नर ता. जुन्नर जुन्नर |
| १४ | २०३२०६४ | दीपक सुरेश सातपुते<br>मु. पो. सदाबाजारपेठ जुन्नर ता. जुन्नर जुन्नर |
| १५ | २०३२१११ | राजीयाबी रज्जाक शेख<br>मु. पो. मंगळवार पेठ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| १६ | २०३२११८ | परविन साजिद बेपारी<br>मु. पो. पणसुंबा पेठ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| १७ | २०३२१३७ | नफिसाफी रशीद बेपारी<br>मु. पो. खलील पुरा जुन्नर ता. जुन्नर जुन्नर |
| १८ | २०३२१४४ | बाळासाहेब अर्जुन देवणे<br>मु. डव्हरा वस्ती पो. शिरोली बु जुन्नर ता. जुन्नर जि. |
| चाकण शाखा | | |
| १ | ४०३१४९७ | हनुमंत बबन दौंडकर<br>मु. पो. शेलपिंपळगाव ता. खेड जि. पुणे खेड |
| २ | ४०३१५३६ | प्रशांत सुरेश कुटे<br>पीरसाई मंदिराजवळ मु. पो. भोसे ता. खेड जि. पुणे खेड |
| ३ | ४०३१५४२ | प्रशांत सुरेश कुटे<br>पीरसाई मंदिराजवळ मु. पो. भोसे ता. खेड जि. पुणे खेड |
| ४ | ४०३२३९५ | सुनिता सुरेश शिंदे<br>चाकण सौंदर्य रेसि. फ्लॅट नंबर सी ४०५ खेड |
| ५ | ४०३२९०२ | सुवर्णा जितेंद्र झरेकर<br>मु. शेलगाव दत्तवाडी, दत्त मंदिराजवळ शेलपिंपळगाव खेड. |
| ६ | ४०३२९३३ | साई भगवंत आल्हाट<br>देशमुख आळी चाकण ता. खेड खेड |
| ७ | ४०३२९३६ | प्रियांका मोहन चौधरी<br>मु. पो. गोलेगाव दत्त मंदिराजवळ खेड |
| ८ | ४०३२९३७ | प्रियांका मोहन चौधरी<br>मु. पो. गोलेगाव दत्त मंदिराजवळ खेड |
| ९ | ४०३३०१४ | सुवर्णा जितेंद्र झरेकर<br>मु. शेलगाव दत्तवाडी दत्त मंदिराजवळ शेल पिंपळगाव खेड |
| १० | ४०३३०५७ | तानाजी चेंडीराम कोळेकर<br>मु. करंजविहिरे पो. शिवे ता. खेड जि. पुणे खेड |
| ११ | ४०३३०६३ | भाऊसाहेब भगवान दिघे<br>मु. पो. दिघे वस्ती कोयाळी ता. खेड जि. पुणे खेड |
| १२ | ४०३३१०४ | मारुती लक्ष्मण नवले<br>कोठबाई मंदिराजवळ वाहगाव पो. शिवे ता. खेड खेड |
| १३ | ४०३३१३३ | नामदेव तुळशीराम चौधरी<br>मु. पिंपळगाव हनुमान मंदिराजवळ पोसोळू ता. खेड. जि. |
| १४ | ४०३३१३४ | दत्तात्रय अरुण भुजबळ<br>जुने खंडोबा मंदिराजवळ मेदनकर वाडी चाकण खेड |
| १५ | ४०३३१४५ | संतोष पंढरीनाथ कल्हाटकर<br>मु. कोरेगाव पो. किवळे ता खेड खेड |
| १६ | ४०३३१४८ | अविनाश संपत दौंडकर<br>जि. प. शाळेजवळ जैदवस्ती चिंबळी खेड |
| १७ | ४०३३१४९ | अविनाश संपत दौंडकर<br>जि. प. शाळेजवळ जैद वस्ती चिंबळी खेड |
| १८ | ४०३३१५८ | कैलास गंगाराम कोळपे<br>बाळूमामा मंदिराजवळ मु. पो. कोयाली ता. खेड जि. पुणे खेड |
| १९ | ४०३३१७१ | अतेश राघू बोऱ्हाडे<br>मु. करंज विहिरे पो. शिवे मराठी शाळेजवळ थोपटवाडी ता. |
| २० | ४०३३४२० | नारायण ज्ञानोबा बगाडे<br>राणूबाई मळा चाकण जि. प. शाळेजवळ ता. खेड खेड |
| २१ | ४०३३४३१ | शंकर बबन भाडळे<br>कोयाळी ता. खेड जि. पुणे खेड |
| २२ | ४०३३४६३ | दत्तात्रेय बापू कोपनर<br>मराठी शाळेजवळ चिंबळी ता. खेड जि. पुणे खेड |
| २३ | ४०३३४६५ | भाऊसाहेब रभाजी बरकडे<br>मराठी शाळेजवळ कोयाळी ता. खेड जि. पुणे चाकण |
| २४ | ४०३३४८२ | जयश्री अशोक यादव<br>काळुस फाटा रायगड कॉलनी पाच मु. पो. भोसे ता. खेड जि. पुणे |
| २५ | ४०३३४८७ | सत्यवान संपत लांडे<br>जि.प. शाळेजवळ शेल पिंपळगाव ता. खेड जि. पुणे खेड |
| २६ | ४०३३५२५ | श्री. संजय कोंडीबा भोकसे<br>मु. पो. कुरकुंडी ता. खेड जि. पुणे |
| २७ | ४०३३५४९ | गोपिका राजू पवळे<br>लक्ष्मी मंदिराजवळ कोयाळी खेड |
| २८ | ४०३३५५९ | सोनाली दिनकर दिघे<br>मु. पो. कोयाळी भाडळे वस्ती जिल्हा परिषद शाळेजवळ |
| २९ | ४०३३५६४ | राजेश ओमप्रकाश परदेशी<br>म. फुले चौक चाकण खेड |
| ३० | ४०३३५८३ | संगीता कालिदास काळे<br>गणेश मंदिराजवळ पिंपरी खुर्द पो.आंबेठाण ता. खेड |
| ३१ | ४०३३५९६ | दादाभाऊ दत्तू दिघे<br>कोयाळी ता. खेड जि. पुणे खेड |
| ३२ | ४०३३५९९ | पुनम शंकर तिखे<br>मोरया हाऊ सो फ्लॅट नंबर ५०१ चाफेकर चौक चिंचवड पुणे |
| ३३ | ४०३३६०४ | प्रमोद बबन सुके<br>मु. पो. सुकेवाडी ता. शिरूर शिरूर |
| ३४ | ४०३३६०६ | अतुल एकनाथ वाघुले<br>गावठाण मु. पो. कोयाळी ता. खेड जि. पुणे खेड |
| ३५ | ४०३३६३२ | शुभम अरुण मुंगसे<br>मुंगसे वस्ती मु. पो. रासे ता. खेड जि. पुणे खेड |
| ३६ | ४०३३६७३ | भिमाबाई राजू दाते<br>c/o. अरुण किरवे गणपती मंदिराजवळ मु. पो. देहू ता हवेली जि. पुणे |
| ३७ | ४०३३६८७ | सचिन बाळू काळे<br>गणेश मंदिराजवळ काळे वस्ती मु. पो. कोयाळी ता. खेड जि. पुणे |
| ३८ | ४०३३६९१ | काळूराम पिराजी गायकवाड<br>खंडोबा माळ चाकण बलुत आळी चाकण ता. खेड जि. पुणे |
| ३९ | ४०३३७०३ | भानुदास काळूराम खैरे<br>मु. पो. काळुस ता. खेड जि. पुणे |
| ४० | ४०३३७०४ | भानुदास काळूराम खैरे<br>मु. पो. काळुस ता. खेड जि. पुणे |
| ४१ | ४०३३७०५ | विठ्ठल सुदाम कलवडे<br>पोपटवाडी मु. करंजविहिरे पो. शिवे ता. खेड जि. पुणे खेड |
| ४२ | ४०३३७२९ | मधुकर जयवंत चिंतेवाड<br>गोल्डन चौक खंडोबा माळ चाकण खेड |
| ४३ | ४०३३७३९ | नारायण ज्ञानोबा बगाडे<br>राणूबाई मळा चाकण जि. प. शाळेजवळ ता. खेड खेड |
| ४४ | ४०३३७५० | नारायण ज्ञानोबा बगाडे<br>राणूबाई मळा चाकण जि. प. शाळेजवळ ता. खेड खेड |
| ४५ | ४०३३७६० | शबाना अजीज शेख<br>गणेश बेकरी समोर नवाज मंजिल बलुत आळी, चाकण जि. पुणे |
| ४६ | ४०३३७६८ | विशाल निवृत्ती मेदनकर<br>गट नंबर २७८ गणपती मंदिराजवळ मुहेवस्ती पो. कुरळी ता खेड |
| ४७ | ४०३३७८५ | सुमित्रा गणेश बवले<br>अंगणवाडी शाळेजवळ मु. पो. वडगाव घेनंद तालुका खेड जिल्हा पुणे |
| ४८ | ४०३३८०४ | भगवान मगनभाई जांभळे<br>नाणेकरवाडी चाकण ता. खेड जि. पुणे खेड |
| ४९ | ४०३३८०५ | भगवान मगनभाई जांभळे<br>नाणेकरवाडी चाकण ता. खेड जि. पुणे खेड |
| ५० | ४०३३८२० | पल्लवी राहुल मांडेकर<br>हनुमान मंदिराजवळ आंबेठाण ता. खेड खेड |
| ५१ | ४०३३८२९ | कैलास हरिश्चंद्र माने<br>कडाचीवाडी चाकण ता. खेड जि. पुणे खेड |
| ५२ | ४०३३८३१ | संदीप नवनाथ मुंढे<br>मु. पो. खालुम्ब्रे ता. खेड जि. पुणे खेड |
| ५३ | ४०३३८६६ | दादाभाऊ दत्तू दिघे<br>कोयाळि ता. खेड जि. पुणे खेड |
| ५४ | ४०३३८७० | सागर शिवराम कारले<br>मारुती मंदिराजवळ आंबेठाण ता. खेड जि. पुणे खेड |
| ५५ | ४०३३८८१ | काळूराम पिराजी गायकवाड<br>खंडोबा माळ चाकण बलुताळी चाकण ता. खेड जि. पुणे |
| ५६ | ४०३३९०८ | भगवान श्रीराम परिहार<br>विशाल गार्डन फ्लॅट नंबर के ८ मु. पो. चाकण ता. खेड खेड |
| धान्यबाजार शाखा | | |
| १ | ३०३८७०८ | हेमंत चंद्रकांत भुजबळ<br>मु. पो. येणेरे जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| २ | ३०३९८५५ | वसीम वजीर पटेल<br>मु. पो. बादशहा तलाव जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ३ | ३०४०३७६ | धनाजी मोघा मुकणे<br>मु. घाटघर पो. अंजनामुळे ता. जुन्नर जि. पुणे जुन्नर |
| ४ | ३०४०६४७ | मारुती पुनाजी मुठे<br>मु. पो. तळेरान वसईवाडी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ५ | ३०४०६४८ | मारुती पुनाजी मुठे<br>मु. पो. तळेरान वसईवाडी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ६ | ३०४१९५६ | गोरख सोमनाथ घोडे<br>मु. पो. अंबोली जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ७ | ३०४२४२५ | मधुकर दगडू रेगडे<br>मु. शिलेचीवाडी, पो. गोद्रे ता. जुन्नर, जि. पुणे. |

पुढे पहा...

| | | |
|---|---|---|
| ८ | ३०४२६१० | हिराबाई दत्तात्रय गवारी<br>मु. हडसर पो. राजुर १ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ९ | ३०४२९४४ | शबीना इसाक शेख<br>मु. पो. शिपाई मोहल्ला जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| १० | ३०४२९४५ | लुमाभोरू माळी<br>मु. आंबे पो. इंगळून जुन्नर |
| ११ | ३०४३५२२ | हेमंत कृष्णाजी वाघुले<br>मु. निमगाव तर्फे महाळुंगे पो. सावरगाव जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| १२ | ३०४३५७३ | संतोष हरिश्चंद्र शिंदे<br>मु. पो. वडज वाघामळा जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| १३ | ३०४३८०७ | मारुती पुनाजी मुठे<br>मु. पो. तळेरान वसईवाडी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| १४ | ३०४४०५२ | रमेश कानू मोधे<br>मु. तलाखी पो. कुसुर जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| १५ | ३०४४१९६ | अमृता विलास खांडगे<br>मु. पो. माणिक डोह ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| १६ | ३०४४३२३ | संतोष रखमाजी गांगड<br>मु. आमलेवाडी पो. खानगाव जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| १७ | ३०४४३७२ | ऋषिकेश कैलास परदेशी<br>मु. पो. शिवबा भोजनालय गॅस गोडाऊन समोर बारव ता. जुन्नर |
| १८ | ३०४४४३१ | अरुण अनंता कबाडी<br>मु. पो. कबाडवाडी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| १९ | ३०४४४३२ | अरुण अनंता कबाडी<br>मु. पो. कबाडवाडीत जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| २० | ३०४४४३८ | मयूर पोपट घोलप<br>मु. लोणारआळी स्वप्न साकार सोसायटी जुन्नर ता. जुन्नर |
| २१ | ३०४४४४१ | साईनाथ उत्तम नेहरकर<br>मु. नेहरकर वस्ती पो. खामगाव ता. जुन्नर, जि. पुणे. |
| २२ | ३०४४४८५ | रंजना तुकाराम डामसे<br>मु. पो. इंगळून डामसेवाडी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| २३ | ३०४४४९० | ठकू देवराम कोकणे<br>मु. पो. अंजनावळे तळेचीवाडी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| २४ | ३०४४५३१ | लक्ष्मण भाऊ तातळे<br>मु. पो. गोद्रे भोजनेवाडीत जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| २५ | ३०४४५३३ | रोहिणी चंद्रकांत साबळे<br>मु. खांडेचीवाडी पो. निमगिरी जुन्नर |
| २६ | ३०४४५४६ | तानाजी दुला शेळकंदे<br>मु. हातविज पो. इंगळून जुन्नर ता. जुन्नर जि. पुणे जुन्नर |
| २७ | ३०४४५९२ | दशरथ वसंत सोनवणे<br>मु. पो. बारव जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| २८ | ३०४४६१९ | रवींद्र मारुती ढोले<br>मु. पो. येणेरे जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| २९ | ३०४४६३१ | ओंकार बाळू मरभळ<br>मु. घोगरेवाडी पो. आपटाळे जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ३० | ३०४४६३४ | राजेश दादू साबळे<br>मु. पो. निमगिरी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ३१ | ३०४४६४१ | दिलीप नामदेव कडलक<br>मु. भिवाडे बु. पो. उच्छिल जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ३२ | ३०४४६४२ | पूजा दिनेश बनकर<br>मु. पो. रोके मारुती मंदिराजवळ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ३३ | ३०४४६४५ | साकेबुनीसा इस्माईल बैपारी<br>मु. पो. पणसुंबापेठ कसाई वाडा जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ३४ | ३०४४७२० | गोविंद निवृत्ती घोगरे<br>मु. पो. नेतवड जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ३५ | ३०४४७४८ | बाळू नामदेव सांगडे<br>मु. तेजुर पो. आपटाळे जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ३६ | ३०४४७८२ | अहमदअश्रफ अब्दुलमन्नान कुरेशी<br>मु. पो. खलीलपुरा जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ३७ | ३०४४८३५ | सुप्रिया संजय खिलारी<br>मु. पो. लोणारआळी जुन्नर जुन्नर |
| ३८ | ३०४४८८१ | देवराम शंकर मेमाणे<br>मु. खिरेश्वर पो. खुबी ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ३९ | ३०४४८८७ | नूरजहेरा वजाहतअली सय्यद<br>मु. पो. बारव पूर्व जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ४० | ३०४४८९९ | ज्योती अनिल लवांडे<br>मु. पो. कबाडवाडी पाडळी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ४१ | ३०४४९४३ | विद्या मारुती जावळे<br>मु. हिवरे तर्फे मिन्हेर पो. इंगळून जुन्नर ता. जुन्नर |
| ४२ | ३०४४९६३ | वैशाली महेंद्र बाळसराफ<br>मु. पो. निमगिरी इंदिरानगर जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ४३ | ३०४४९६४ | ठकू देवराम कोकणे मु. पो. अंजनावळे तळेचीवाडी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ४४ | ३०४४९८५ | सुनील सोमा गवारी<br>मु. कुकडेश्वर पो. चावंड जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ४५ | ३०४५००९ | अनिता शांताराम चव्हाण<br>मु. पो. वडज जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ४६ | ३०४५०१८ | अंकुश लक्ष्मण डोके<br>मु. कुमशेत पो. शिरोली बु. जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ४७ | ३०४५१५७ | महमदमेराज नजरअली सय्यद<br>मु. पो. सय्यद वाडा जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ४८ | ३०४५१५८ | महमदमेराज नजरअली सय्यद<br>मु. पो. सय्यदवाडा जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ४९ | ३०४५२०९ | मुख्तार मुश्ताक खान<br>मु. पो. बादशहा तलाव जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे |
| ५० | ३०४५३३४ | नयना दर्शन लालबिगे<br>मु. पो. शुक्रवार पेठ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. आंबेगाव |
| ५१ | ३०४५३६६ | ज्ञानेश्वर खंडू गवारी<br>मु. हडसर कोटमवाडी पो. राजुर नंबर १ जुन्नर ता. जुन्नर |
| ५२ | ३०४५३८९ | ज्योती तुकाराम गवारे<br>पिंपरवाडी पो. आंबोली, ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ५३ | ३०४५४५३ | दिनेश मनोहर देवाडे<br>मु. वानेवाडी पो. आपटाळे जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ५४ | ३०४५४९२ | धनेश अशोक गोरडे<br>मु. बस्ती गोरडेमळा पो. सावरगाव जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ५५ | ३०४५५२२ | नाझिया नौशाद इनामदार<br>मु. पो. मंगळवार पेठ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ५६ | ३०४५५२६ | शशिकांत बबन भवारी<br>मु. तेजुर पो. आपटाळे जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ५७ | ३०४५६२९ | सखाराम कमान निर्मळ<br>मु. हातवीज पो. इंगळून जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ५८ | ३०४५६३४ | जालिंदर गंगाराम बुळे<br>मु. फांगुळगव्हाण पो. खडकुंबे जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ५९ | ३०४५६६८ | शैलेश विश्वनाथ डगळे<br>मु. पिंपरवाडी पो. इंगळून जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ६० | ३०४५६६९ | शैलेश विश्वनाथ डगळे<br>मु. पिंपरवाडी पो. इंगळून जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ६१ | ३०४५६७३ | निवृत्ती किसन साळुंके<br>मु. पो. कबाडवाडी बुट्टेवाडी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ६२ | ३०४५६७५ | लीला चंद्रकांत सांगडे<br>मु. हडसर पो. राजूर नंबर १ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ६३ | ३०४५७१० | संपत गणपत लांडे<br>मु. केवाडी पो. राजुर नंबर १ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ६४ | ३०४५७६१ | अनिल होनाजी रेंगडे<br>मु. पो. गोद्रे भोजणेवाडी जुन्नर |
| ६५ | ३०४५७६२ | सुनील चंदर चिमटे<br>मु. पूरकुकडेश्वर पो. चावंड जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ६६ | ३०४५७६६ | पांडुरंग लक्ष्मण बोऱ्हाडे<br>मु. सोनावळे पो. इंगळून जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ६७ | ३०४५७९३ | सुभद्रा भरत काळे<br>मु. पो. पारगाव तर्फे मड स्टॅण्डजवळ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ६८ | ३०४५८४० | चंद्रकांत सदाशिव नायकोडी<br>मु. पो. बल्लाळवाडी भैरवनाथ मंदिर जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. |
| ६९ | ३०४५८४५ | सुरेखा विजय बनकर<br>मु. पो. कल्याण पेठ रोकडे मारुती मंदिराजवळ जुन्नर ता. जुन्नर |
| ७० | ३०४५८५५ | शांताराम सखाराम कोकणे<br>मु. फांगुळगव्हाण पो. खडकुंबे जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ७१ | ३०४५८५७ | संजय बबन मोधे<br>मु. पो. कुसुर तलाखी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ७२ | ३०४५८६७ | धनश्री संतोष गीते<br>मु. पो. ब्राह्मण बुधवार पेठ सुमती गणेश अपार्टमेंट फ्लॅट नंबर ३ |
| ७३ | ३०४५८९४ | मनीषा पंढरीनाथ भगत<br>मु. पो. खानापूर जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ७४ | ३०४५९१३ | सचिन अशोक मोहिते<br>मु. पो. पाडळी कबाडवाडी बुट्टेवाडी जुन्नर जुन्नर |
| ७५ | ३०४५९३२ | संजीवनी संतोष लांडे मुकेवाडी<br>पो. राजूर नंबर १ जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे. जुन्नर |
| ७६ | ३०४५९४६ | निवृत्ती किसन साळुंके मु. पो. कबाडवाडी बुट्टेवाडी जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे |

सही/-
दिपक गजानन खत्री
(मुख्य कार्यकारी अधिकारी)
शिवशक्ती नागरी सहकारी पतसंस्था मर्या, जुन्नर

# माझी गाणी आजही रसिकांच्या पसंतीत : सिनेगीतकार समीर अंजान

## 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाच्या 'पर्सोना महोत्सवा'ची उत्साहात सांगता



**लोणी-काळभोर (दै. संध्या) :** मी आयुष्यभर हजारो रोमँटिक गाणी लिहिली आहेत. आशिकी, राजा हिंदुस्तानी, साजन, दिवाना, कुछ कुछ होता है या चित्रपटांतील गाणी आजही रसिकांकडून आवडीने ऐकली आणि गायली जातात. माझा चेहरा तितकासा परिचित नसला तरी मी लिहिलेली गाणी आणि त्या गाण्यांच्या ओळी आजच्या नवयुवकांच्या काळजाचाही ठाव घेतात. त्यामुळे, जोपर्यंत माझ्या लिखाणात रसिकांच्या काळजाला स्पर्श करण्याची ताकद आहे, तोपर्यंत मी लिहित राहणार. कारण लेखणात अमरत्वाची ताकद असते. सध्याचे युवकही खूप सुंदर लिहितात. त्यामुळे युवकांनी सुचेल ते लिहित राहायला हवे, असे आवाहन बॉलिवूडमधील हजारो प्रसिद्ध गाण्यांचे लेखक ज्येष्ठ सिनेगीतकार समीर अंजान यांनी केले.

ते एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या आठव्या 'पर्सोना फेस्ट-२६' या वर्षातील सर्वात मोठ्या कला महोत्सवात बोलत होते. याप्रसंगी 'मैंने प्यार किया' चित्रपट फेम अभिनेत्री भाग्यश्री पटवर्धन, अभिनेत्री प्राची शहा-पांडे, सेलिब्रिटी आर.जे. संग्राम खोपडे, 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनिता कराड, संगीततज्ज्ञ आदिनाथ मंगेशकर, डॉ. मुकेश शर्मा, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ. सायली गणकर, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. नचिकेत ठाकूर, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. सुदर्शन सानप, डॉ. गणेश पाठक, डॉ. रेणू व्यास, डॉ. सुराज भोयार, डॉ. दांडेश्वर बिसोई, डॉ. संगिता फुंडे आदी उपस्थित होते.

अभिनेत्री प्राची शहा-पांडे म्हणाल्या, एमआयटी एडीटी विद्यापीठाचा विश्वराजबागेतील हा कॅम्पस सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय समृद्ध आहे. कारण या जागेला जगविख्यात अभिनेते राज कपूर यांचा सहवास लाभलेला आहे. त्यामुळे येथे प्रवेशित विद्यार्थी भाग्यशाली असून त्यांनी या विद्यापीठाचा जास्तीत जास्त फायदा आपली भावी कारकीर्द बहरविण्यासाठी करून घ्यावा.

तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात देशभरातील नामवंत गायक, सिनेगीतकार व कलाकारांची रेलचेल पाहायला मिळाली. यामध्ये सुप्रसिद्ध गायक अमित मिश्रा, मराठी अभिनेता क्षितीज दाते, सेलिब्रिटी डान्सर सिद्धेश थोरात तसेच पुणे महानगरपालिकेतील २२ वर्षीय युवा नगरसेविका कु. सिद्धी शिलिमकर यांचा समावेश होता.

याशिवाय या टेक्नो-कल्चर महोत्सवात नामांकित गायक व बँड यांचे थेट संगीत सादरीकरण (लाईव्ह कॉन्सर्ट), तंत्रज्ञान, व्यवसाय, कला व संस्कृती यांसारख्या विविध क्षेत्रांवरील माहितीपर सत्रे, विद्यार्थ्यांची नृत्य-नाट्य सादरीकरणे, कोडिंग व तांत्रिक स्पर्धा, क्रीडा आणि इतर मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

प्रा. डॉ. कराड म्हणाले की, विद्यार्थ्यांनी दैनंदिन गरजांसोबत एखादा छंद जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना केवळ शिक्षण न देता त्यांच्यातील कलाकार, गायक, चित्रकार, कवी आदी आवडी-निवडींना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यामाध्यमातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी 'पर्सोना महोत्सवा'चे विद्यापीठातर्फे दरवर्षी आयोजन केले जाते. 'पर्सोना'सारख्या कलात्मक उत्सवांच्या माध्यमातून देशाच्या कला-संस्कृतीत भर टाकण्याचे बाळकडू विद्यार्थ्यांना विद्यापीठीय जीवनात देण्याचा आमचा मानस आहे, असेही ते म्हणाले.

या तीन दिवसीय कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी डॉ. अशोक घुगे, डॉ. स्वप्निल शिरसाठ व प्रा. स्नेहा वाघटकर यांनी चोख पार पाडली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अँड. संजय सावंत यांची महावितरण वकील पॅनलवर कायदेशीर सल्लागारपदी निवड

कवठे येमाई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (MSEDCL) वकील पॅनल वर अँड. संजय दत्तात्रय सावंत यांची सल्लागार पदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. महावितरणने वकील पॅनल करीता ठरवून दिलेल्या अटी व नियमांची पूर्तता अँड संजय सावंत यांनी अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्राद्वारे केल्याने महावितरणच्या सर्व वरिष्ठ अधिकारी यांनी सर्व कागदपत्राची पडताळणी करून तसेच अँड सावंत यांचा अनेक वर्षाचा कामाचा अनुभव पाहून त्यांची कायदेशीर सल्लागार पदी आधिकृतपणे निवड केली आहे.अँड संजय सावंत पाटील यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक,जगदंब सामाजिक प्रतिष्ठान, येसूबाई सामाजिक प्रतिष्ठान येथे जवळपास ४ वर्ष पेक्षा जास्त वर्ष कायदेशीर सल्लागार म्हणून काम पाहिलेले आहे. तसेच पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात मध्ये असलेल्या पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वरती मोफत कायदेशीर सल्लागार म्हणून देखील कार्यरत आहेत. अँड. सावंत हे गेली अनेक वर्षे पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात अनेक वर्षे वकीली व्यवसाय करत आहेत. पुणे विभागाच्या अधिकारी लीगल अँडव्हायजर (I/C) असलेल्या नितल हसे यांनी अँड. सावंत यांना त्यांच्या निवडीचे आधिकृत पत्र नुकतेच दिले. महावितरणच्या पॅनल अँडव्होकेट म्हणून नियुक्ती झाल्यानंतर अँड. संजय दत्तात्रय सावंत (पाटील) यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड चे महाराष्ट्र राज्याचे संचालक राजेंद्र पवार, वरिष्ठ अधिकारी (CLA) आर.आर. गांधी, पुणे परिमंडळ चे मुख्य अभियंता सुनिल काकडे, असिस्टंट लॉ ऑफिसर दिनकर तिडके, पुणे विभाग महावितरण कार्यालयचे सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे विशेष आभार व्यक्त केले आहेत.

### संत धन निरंकार संस्था व जुन्नर नगरपरिषद यांच्यावतीने स्वच्छता अभियान

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर नगर परिषद हद्दीतील भास्कर घाट स्मशानभूमी या ठिकाणी संत धन निरंकार संस्था व जुन्नर नगरपरिषद यांच्या वतीने स्वच्छता अभियान राबवण्यात आले.व संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. या प्रसंगी संथ धन निरंकार संस्थेचे डाके सर, त्यांचे सर्व शिक्षक, महात्मे , जुन्नर नगरपालिकेचे गुणवारे, नगराध्यक्ष सौ. सुजाता मधुकर काजळे, उपनगराध्यक्ष सौ रूपाली परदेशी, नगरसेवक भाऊ कुंभार , डिसेंट फाऊंडेशनचे जितेंद्र बिडवई व नगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.



### स्किल डेव्हलपमेंट सेंटर- MIDC, कारेगाव येथे शिवजयंती उत्साहात साजरी

कवठे येमाई (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरी केली जाते. शिवनेरी किल्ल्यापासून ते राज्यभरातील गावागावांत आणि शहरांत हा उत्सव 'शिवमय' वातावरणात साजरा होतो. शिरूर तालुक्यातील कारेगाव येथील स्किल डेव्हलपमेंट सेंटर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी स्किल डेव्हलपमेंट सेंटर मधील विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेच्या कार्यावर आधारित प्रभावी वक्तृत्वाचे सादरीकरण करीत उपस्थितांची माने जिंकली. काही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गीत गायन द्वारे वातावरणात एक चैतन्य निर्माण केले. केंद्र संचालक संजय पारडे यांनी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या आदर्शांचे पालन करून राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्याचे आवाहन केले. यावेळी सिनिअर एक्झिकेटिव्ह देवकीनंदन शेटे,सेंटरमधील सर्व सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण रानमाळे यांनी केले तर आभार केंद्रप्रमुख श्रीनिवास माने यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

### वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी जेजुरी गड परिसराची केली पाहणी



जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री मार्तंड देवसंस्थान च्या विश्वस्त मंडळाने राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन गडाच्या परिसरात असणाऱ्या वन विभागात काही विकास कामे व्हावीत अशी मागणी केली होती.याची दखल घेवून वन विभागाच्या वतीने जेजुरी गड परिसराची पाहणी करण्यात आली. जेजुरी देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे,विश्वस्त पोपट खोमणे,अनिल सौंदडे, ॲड पांडुरंग थोरवे यांनी मुंबई येथे वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेवून जेजुरी गडाचा परिसर हा वन विभागाच्या हद्दीत येत असून या परिसरात दसरा पालखी मार्ग, गडा भोवती संरक्षक भिंत, तसेच जेजुरी गडपाठीमागे असणाऱ्या उद्यानाची दुरुस्ती करावी अशी मागणी केली होती. या बैठकीनुसार पुणे विभागाचे प्रादेशिक वन संरक्षक आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक, महादेव मोहिते, सागर ढोले, दिपाली शिंदे, धनंजय देवकर, सोनाली कांबळे व इतर वन अधिकारी वर्गाने जेजुरी गडाच्या मागील रमणा परिसर येथील वन विभागाचे हद्दीतील दसरा पालखी मार्ग,उद्यान, कमानी, बेंचेस आदी कामांची पाहणी केली.यावेळी देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे, व्यवस्थापक आशिष बाठे, जनसंपर्क अधिकारी सागर गोडसे उपस्थित होते. यावेळी दसरा पालखी मार्ग लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी देवसंस्थान अध्यक्ष मंगेश घोणे यांनी केली. यावेळी जेजुरीगड तिर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत भाविक-भक्तांच्या सोई-सुविधेसाठी, पर्यटन वाढावे यासाठी विविध विकास कामांचा आढावा घेण्यात आला.

# बारामतीच्या सूर्यनगरीत 'घरफोडी' करणारा अटक

## बारामती तालुका पोलिसांची कारवाई; गोपनीय माहितीच्या आधारे चोरी करणारा आणि विकत घेणारा आरोपी जेरबंद

बारामती (दै. संध्या)



बारामती तालुक्यातील सूर्यनगरी परिसरात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याच्या दोन घटना ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी आणि ११ जानेवारी रोजी दुपारी घडल्या होत्या.या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय माहिती आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.फिर्यादी श्रीकांत अशोकराव बिरादार (वय ३३ रा.सूर्यनगरी, बारामती) हे महावितरण शाखा सणसर येथे तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी नेहमीप्रमाणे कामावर जाऊन सायंकाळी घरी परतल्यानंतर रात्री साडेनऊच्या सुमारास त्यांच्या पत्नी प्रज्ञा यांनी कपाटातील दागिने ठेवलेला कप्पा उघडा असल्याचे पाहिले. कपाटातील वस्तू अस्ताव्यस्त अवस्थेत असून सोन्याचे व चांदीचे दागिने तसेच अंदाजे १० हजार रुपये रोख रक्कम गायब असल्याचे निदर्शनास आले.

पत्नी सायंकाळी पाच ते सहा या वेळेत मुलाला खेळवण्यासाठी खाली रस्त्यावर घेऊन गेल्या असताना घराचा दरवाजा पुढे लावलेला होता. याच वेळेत अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून चोरी केली आली आहे.

यामध्ये सोन्याचे मिनी गंठन (१७.५ ग्रॅम) रु.५०,०००, सोन्याचे काप (८ ग्रॅम) रु.२०,०००, सोन्याचे एअररिंग (४ ग्रॅम) रु.१०,०००, दोन सोन्याच्या अंगठ्या (६ ग्रॅम) रु.१०,०००, चांदीचे पैंजण रु.१,०००, रोख रक्कम रु.१०,००० असा एकूण अंदाजे किंमत २ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेलेला आहे.या प्रकरणी भा.न्या. संहिता कलम ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सुरेंद्र वामनराव चव्हाण वय 48 वर्षे व्यवसाय मेस राहणार सुमन रेसिडेन्सी फ्लॅट नं. 3 सूर्यनगरी ता. बारामती यांच्याही घरी अशाच घटना होऊन ३५ हजार रुपये रोख रक्कम चोरी झाले होते.

तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज तपासून पोलिसांनी तांदुळवाडी (ता. बारामती) येथून ऋषिकेश विजय कोकाटे (वय २१, रा.अंबिका नगर,इंदापूर) याला ताब्यात घेतले. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.चौकशीत आरोपीने चोरीची कबुली देत चोरीतील सोन्याचे दागिने सोनार श्रेयस विठ्ठल कुलथे (वय २५ रा.व्यंकटेश नगर,इंदापूर) याच्याकडे दिल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी सोनार कुलथे यालाही अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, बारामती तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस अमलदार केदारनाथ बिडवे,सुरेंद्र वाघ,भारत खारतोडे,मनोज पवार,जितेंद्र शिंदे,राहुल मखरे,सुरेश लांडगे, स्थानिक गुन्हे शाखेचे स्वप्निल अहिवळे,अभिजीत एकशिंगे यांनी केली आहे.

## डॉ. मेहबूब सैय्यद यांना राजर्षी शाहू महारत्न पुरस्कार जाहीर

चाकण (दै. संध्या)

अखिल मराठी साहित्य, सांस्कृतिक कला व आरोग्यदायी विकास परिषद, महाराष्ट्र राज्य आणि लिंबराज फिल्मस् यांच्या संयुक्त विद्यमाने शिव, शाहू, फुले, आंबेडकर मराठी साहित्यिक व कलावंत संमेलनाचे औचित्य साधून येथील डॉ. मेहबूब सैय्यद यांना राजर्षी शाहू महारत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. बारामती येथे २६ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या एका भरगच्च कार्यक्रमात सैय्यद यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता अहिल्यादेवी, आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक, शाहीर अमर शेख व साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव व त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील लोककला, संस्कृती आणि साहित्याच्या माध्यमातून समाज जागृती घडवून आणण्याचा या संमेलना मागील प्रमुख हेतू आहे. ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. सातारा लोकसभेचे खासदार श्रीनिवास पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, साहित्यिक, कलावंत व सामाजिक कार्यकर्ते या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. यावेळी सामाजिक, साहित्यिक व उद्योजक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. मेहबूब सैय्यद यांना 'राजर्षी शाहू महारत्न पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या नियोजित संमेलनासाठी महाराष्ट्रासह विविध प्रांतांतील हजारो साहित्यिक, कलावंत व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, हा सोहळा सांस्कृतिक एकात्मतेचा आणि विचार प्रबोधनाचा महोत्सव ठरणार आहे, अशी माहिती डॉ. बी.डी. गायकवाड, बा.ह. मगदम, दत्तू ठोकळे व कल्पना जोशी यांनी दिली.

## स्वराज्य संग्रामच्या माध्यमातून १९ फेब्रुवारी नंतर स्वच्छता मोहीम

### "ज्यांचा रक्तगट हा शिवराय आहे" — महेश लाड, अध्यक्ष स्वराज्य संग्राम

जुन्नर (दै. संध्या)



सालाबाद प्रमाणे याही वर्षी शिवजयंती उत्सव नंतर २० फेब्रुवारी रोजी स्वराज्य संग्रामच्या वतीने किल्ले शिवनेरी येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. गेली दहा वर्षे अखंडपणे ही परंपरा जपली जात असून, १९ फेब्रुवारीच्या शासकीय शिवजयंतीनंतर २० फेब्रुवारीला स्वराज्य संग्रामची टीम किल्ल्यावर पोहोचते. शिवजयंती व इतर दिवशी येणारे पर्यटक शिवनेरीवर भेट द्यायला येतात पण जाताना मात्र काही गोष्टींची काळजी घेत नाहीत. गडकिल्ले या फक्त वास्तू नाहीत तर ते आपल्याला ऐतिहासिक महत्त्व देणारे एकमेव घटक आहेत. त्यामुळे सर्वांनी याबाबत जागरूक असणे गरजेचे आहे. तसेच गडाच संवर्धन हे केलेच पाहिजे. त्यामध्ये किल्ल्यावरील प्लास्टिक बाटल्या, तुटलेल्या चपला, खाऊच्या पुड्या, गुटख्याच्या पुड्या तसेच इतर सर्व प्रकारचा कचरा जवळपास ४० गोण्या कचरा गोळा करून तो किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत आणण्यात आला व जुन्नर नगरपरिषदेला सुपूर्द केला. अग्रण धुळगाव, सांगली व पुणे येथून सकाळी लवकर सदस्य किल्ल्याच्या पायथ्याशी एकत्र जमले आणि उत्साहात स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली. विशेष म्हणजे स्वराज्य संग्राममध्ये लहान मुले व महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून आला. नवीन पिढीला केवळ ऐतिहासिक वारसा सुपूर्द करण्यापेक्षा त्यांना स्वच्छता व संवर्धनाचे भान देणे हाच या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

मोहीमेच्या दरम्यान ब्लूटूथ स्पीकरवर शिवशाहीर बाबासाहेब देशमुख यांनी गायलेले पोवाडे ऐकत सर्वांनी मोठ्या जोमाने आणि उत्साहात ही मोहीम यशस्वी केली. यावेळी बोलताना स्वराज्य संग्रामचे अध्यक्ष महेश लाड म्हणाले,"गेली दहा वर्षे आपण स्वच्छता मोहीम राबवत आहोत. मात्र स्वच्छता मोहिमेनंतर वर्षभर काय करायचे? तर 'आपले स्वराज्य! आपले उद्योजक!!' ही चळवळ आता जोमाने पुढे न्यायची आहे. प्रत्येक छोटी-मोठी खरेदी आपल्या स्वराज्यातील १८ पगड जाती-धर्मातील बांधवांकडूनच झाली पाहिजे. आपली लोकं म्हणजे कोण? तर ज्यांचा रक्तगट शिवराय आहे अशा सर्वांना एकत्र आणण्याचे कार्य आपण यापुढे करूया."

स्वच्छता मोहिमेचे आयोजन स्वराज्य संग्रामचे रमेश खंडागळे, संदीप कोकाटे, योगेश मोटे व रणजीत पाटील यांनी केले. तसेच डॉटर्स मॉम क्लबच्या सर्व सदस्यांनी आणि लहान मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उपक्रम अधिक प्रेरणादायी केला.

## डिंभे उजवा, डावा कालवा, घोड शाखा यांना पाण्याचे आवर्तन सुरु

### शिरूर- आंबेगावच्या शेतकऱ्यांना मिळणार दिलासा : माजी मंत्री वळसे पाटील यांचा पाठपुरावा

कवठे येमाई (दै. संध्या)



फेब्रुवारी महिना अद्याप संपला नसताना थंडी जवळपास गायब झाली असून उन्हाची तीव्रता वाढताना दिसून येत आहे. अशा परस्थितीत शिरूर,आंबेगाव मधील शेतीला असणारे पाण्याचे श्रोत ही कमी पडताना दिसून येत आहेत. हीच बाब लक्षात घेत या भागाचे विधानसभा प्रतिनिधी तथा राज्याचे माजी सहकार मंत्री ना. दिलीपराव वळसे पाटील यांनी अधीक्षक अभियंता कुकडी सिंचन मंडळ,पुणे यांना नुकतेच या कालव्यात पाणी सोडण्याबाबतचे पत्र ही दिले होते. तसेच काल दि. २१ ला राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी दिलीपराव वळसे पाटील यांच्या झालेल्या सकारात्मक चर्चेनुसार निर्णय घेण्यात आला. वळसे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे रविवार दि. २२ ला सकाळी डिंभे उजवा व डावा कालवा (घोड शाखा) यांना पाण्याचे आवर्तन सुरु झाल्याची माहिती आंबेगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष विष्णूकाका हिंगे यांनी दिली.

ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर डिंभे उजवा, डावा कालवा,घोड शाखा यांना पाण्याचे आवर्तन सुरु झाल्याने या भागातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून पिण्याचे पाणी, शेतीमाल,जनावरांची चारा पिके, विहिरींना पाणी वाढण्यासाठी मोठाच फायदा होणार आहे.

फक्त नियोजन बद्ध पद्धतीने कालव्यास सुटलेले पाणी सर्वांना सारखे व मुबलक मिळावे अशी अपेक्षा नागरिक व शेतकरी बांधवांमधून व्यक्त होत आहे.

## 'महाराष्ट्र केसरी' निवड चाचणी संपन्न



सासवड (दै. संध्या)

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी पुरंदर तालुक्यातील मल्लांची निवड चाचणी स्पर्धा शनिवारी (ता. २१) येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या छत्रपती शिवाजी कुस्ती संकुलात उत्साहात पार पडली. यामध्ये महाराष्ट्र केसरी खुल्या गटासाठी पुरंदरमधून प्रतिक जगताप याची निवड करण्यात आल्याची माहिती पुरंदर तालुका कुस्तीगीर संघाचे सचिव रवींद्रपंत जगताप यांनी दिली. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी जिल्हा कुस्तीगीर संघाचे राजेंद्र जगताप, तालुका संघाचे आण्णा कामथे, गुलाब गायकवाड, अशोक झेंडे, बाळासो कोलते, भाऊ मोरे, रघुनाथ जगताप, सचिव रविंद्रपंत जगताप, प्रशिक्षक माउली खोपडे, काळभैरवनाथ देवस्थानचे अध्यक्ष रमेश जगताप, सुधाकर गिरमे, रामभाऊ इनामके, राजेंद्र बांदल, शेखर कटके, उत्तम शेटे आणि निलेश डांगे उपस्थित होते.

## गोद्रे येथे श्री हटकेश्वर जेष्ठ नागरिक संघाचा मेळावा संपन्न

जुन्नर (दै. संध्या)

मौजे गोद्रे येथे श्री हटकेश्वर जेष्ठ नागरिक संघ यांचा मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मेळाव्याचे आयोजन जुन्नर तालुका ज्येष्ठ नागरिक शिखर समिती चे अध्यक्ष किसन रामभाऊ आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मेळाव्याचे अध्यक्षस्थान भीमा ठमा रेंगडे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धोंडू तुकाराम रेंगडे यांनी केले. त्यानंतर संहितेनुसार प्रार्थना घेऊन मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. मेळाव्यात ज्येष्ठ नागरिक संघाच्या विविध अडीअडचणींवर चर्चा करण्यात आली. विशेषतः नवीन व आजीव सभासद नोंदणी, संघविस्तार तसेच ज्येष्ठांच्या आरोग्यविषयक समस्यांवर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. शासनाच्या विविध योजनांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे वयोमर्यादा ६५ ऐवजी ६० वर्षे करण्यात यावी, असा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शन योजना लागू करण्याबाबत अर्ज भरून घेऊन त्यांचे संकलन करून तालुकास्तरावर सादर करण्याचे ठरविण्यात आले. संघाचे सचिव यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदावर किसन देवजी तळपे यांची नियुक्ती करण्यात आली असून बँक व्यवहार करण्याची अधिकृत परवानगी त्यांना देण्यात आली. या मेळाव्यास सुमारे १२५ ज्येष्ठ नागरिक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रविंद्र कंद यांच्या हस्ते वृक्ष देत सत्कार

कोरेगावमुळ (दै. संध्या)



हवेली तालुक्यातील जिल्हा परिषद गटांमध्ये व पंचायत समिती गणांमध्ये जनतेने विकासाच्या दृष्टीने झेडपी सदस्य व पंचायत समिती सदस्यांना निवडून देत गट, गणांची जबाबदारी देऊन विकासकामे करण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आता जनतेच्या विश्वासाला सार्थ ठेऊन जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गणांचा सर्वांगीण विकास साधावा असे आवाहन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना केले आहे. पुणे हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती तथा संचालक रविंद्र नारायण कंद यांच्या हस्ते हवेली तालुक्यातील विजयी झालेले विविध जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा वृक्ष देत सत्कार पार पडला. यावेळी कंद बोलत होते. यामध्ये पेरणे - लोणीकंद जिल्हा परिषद गटाचे सदस्य पै.किरण साकोरे, थेऊर - आव्हाळवाडी गटाच्या जिल्हा परिषद सदस्या कोमल संदेश आव्हाळे, केसनंद - कोरेगाव मूळ जिल्हा परिषद गटाच्या सदस्या सुरेखा रमेश हरगुडे, खेड शिवापूर जिल्हा परिषद गटाच्या सदस्या रुपाली रमेश कोंडे, तसेच लोणीकंद पंचायत समिती गणाच्या सदस्या मोनिका श्रीकांत कंद, पेरणे पंचायत समिती गणाच्या सदस्या राणी दत्तात्रय वाळके, सोरतापवाडी पंचायत समिती गणाचे सदस्य सुदर्शन चौधरी, थेऊर पंचायत समिती गणाचे सदस्य युवराज काकडे, केसनंद पंचायत समिती गणाचे सदस्य कुशाल गोरख सातव आदी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार प्रत्यक्षात भेट घेऊन पुणे हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती तथा संचालक रविंद्र कंद यांच्या हस्ते त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने पार पडला. याप्रसंगी उद्योजक विक्रम गायकवाड, तुळापूरचे माजी सरपंच अमोल शिवले, संदेश आव्हाळे, रमेश हरगुडे, दत्तात्रय वाळके, श्रीकांत कंद, रमेश कोंडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी सत्कार प्रसंगी रवींद्र कंद बोलताना म्हणाले, पुणे हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून जे काही मदत, सहकार्य आम्हाला करता येईल ते करु. तर शासनाच्या माध्यमातून हवेली तालुक्यातील या गटांच्या व गणाच्या विकासासाठी भरीव निधी मिळवून देण्यासाठी आम्ही नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना साथ देऊ.

# ‘माझी वसुंधरा’ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

## पर्यावरणविषयक मोहिमेची कृषि क्षेत्राशी सांगड घालावी : राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे आवाहन : माझी वसुंधरा हे ईश्वरीय कार्य

मुंबई (दै. संध्या)

- माझी वसुंधरा’ अभियान लोकचळवळ व्हावी : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार
- शाश्वत विकासातुन सक्षम महाराष्ट्र घडविण्यास कटिबद्ध : पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे



पर्यावरण रक्षणासाठी माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून सुरु असलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. माझी वसुंधरा अभियानाला आता लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त होत आहे. भावी पिढीच्या निरोगी आयुष्यासाठी जनसामान्यांच्या मदतीने हाती घेतलेले हे ईश्वरीय कार्य आहे, असे उद्गार राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काढले. रासायनिक शेती, पर्यावरणीय बदल आरोग्यासाठी घातक असून या अभियानाची कृषि क्षेत्राशी सांगड घालण्याची गरज अधोरेखित करून नैसर्गिक शेतीचा पुरस्कार करण्याचे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी यावेळी केले.

वरळी एनएससीआय डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित माझी वसुंधरा राज्यस्तरीय सन्मान सोहळा राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी माझी वसुंधरा मिशन 4.0 आणि 5.0 अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

पर्यावरणासाठी शासन स्तरावर पहिल्यांदाच एवढ्या व्यापक प्रमाणात आणि प्रभावी पद्धतीने मोहिम राबविल्याबद्दल पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांचे राज्यपाल श्री. देवव्रत यांनी अभिनंदन केले. ते पुढे म्हणाले की, पर्यावरण रक्षण हे संपूर्ण जगासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. ग्लोबल वार्मिंगमुळे तापमान वाढू लागले आहे. नैसर्गिक संकटं ओढावण्याची भिती जागतिक पातळीवर व्यक्त केली जात आहेत. निसर्गाचे, पर्यावरणाचे रक्षण करणे हे जीवसृष्टीसाठी महत्वाचे आहे. या अभियानाच्या माध्यमातून सुरु असलेले कार्य हे ईश्वरीय सेवा आहे असेही राज्यपाल यांनी सांगितले.

पर्यावरण रक्षणासाठी राज्यपालांनी यावेळी पंचसूत्री मांडली. पर्यावरणाचे संवर्धन विकास धोरणाच्या केंद्रस्थानी ठेवून, प्रत्येक विकास प्रकल्पात “ग्रीन ऑडिट” अनिवार्य करावे. स्थानिक पातळीवर हरित अर्थव्यवस्थेला चालना देऊन, स्थानिक स्वराज्य संस्थांनी “ग्रीन बजेट” तयार करावे आणि कचरा व्यवस्थापन, सौर ऊर्जा, पावसाच्या पाण्याचे संकलन तसेच नैसर्गिक शेतीला आर्थिक प्रोत्साहन द्यावे. पर्यावरण शिक्षणास प्रोत्साहन देवून, माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून जनसहभागाला चळवळीचे स्वरूप द्यावे आणि प्रत्येक नागरिक “क्लायमेट वॉरियर” बनवावा. डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे वृक्षारोपण, जलसंधारण आणि प्रदूषण नियंत्रणाची रिअल-टाइम पाहणी व्यवस्था निर्माण करावी, जेणेकरून पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित होईल. “माझी वसुंधरा” अभियान हे सर्वांनी ध्येय म्हणून स्वीकारल्यास नक्कीच अपेक्षित बदल घडेल, असा विश्वासही राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.

पृथ्वी, वायू, जल, अग्नि आणि आकाश या पंचतत्त्वांचं जतन करणं आपली संस्कृती आणि कर्तव्य आहे. हवामान बदलाचं संकट आपल्यासमोर उभं असताना ‘माझी वसुंधरा’ अभियानाच्या माध्यमातून केलेली वृक्षारोपण, घनकचरा व्यवस्थापन आणि जलसंधारणाची कामे कौतुकास्पद आहेत. ‘माझी वसुंधरा’ हे अभियान नाही तर लोकचळवळ झाली पाहिजे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केलं.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाचा विचार करत असताना आपल्याला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. निसर्गाच्या बाबतीत त्यांच्या मनात असलेलं हळवेपण आपण सर्वांनी अनेकदा बघितलं आहे. अनेक क्षेत्रात महाराष्ट्रानं देशाला दिशा दिली आहे. विकास केवळ आर्थिक वाढीपुरता मर्यादित न ठेवता, शाश्वत, पर्यावरणपूरक आणि भावी पिढ्यांचा विचार करणारा असावा, हे दिवंगत अजित दादांचं स्वप्न होतं.

महाराष्ट्र कृषी प्रधान राज्य आहे. शेतीची निर्भरता निसर्गावर अवलंबून आहे. जमीन,पाणी, हवा या नैसर्गिक घटकांवर शेती अवलंबून असते. त्यामुळे वातावरण बदलामुळे सर्वात जास्त नुकसान शेतीच होतं. याची नोंद आपण सर्वांनी घेतली पाहिजे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखत, वैज्ञानिक नियोजन आणि लोकसहभागातून वातावरण अनुकूल महाराष्ट्र घडवावा आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित, हरित आणि सक्षम महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प करण्याचे आवाहन करुन माझी वसुंधरा अभियानमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्व पुरस्कारप्राप्त स्थानिक स्वराज्य संस्थांचं उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी अभिनंदन केले.

महाराष्ट्राचा विकास पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन दृष्टीकोनावर आधारित असला पाहिजे. यासाठी नियोजनबद्ध कृती, संस्थात्मक बळकटी आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून आपण शाश्वत विकासातून सक्षम महाराष्ट्र घडविण्यास कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.आज “माझी वसुंधरा” अभियानामुळे पर्यावरण संरक्षण हा विषय प्रत्यक्ष कृतीत उतरला आहे. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक यांच्या समन्वित प्रयत्नांमुळे राज्यात शाश्वततेची मजबूत पायाभरणी होत आहे. राज्य शासनाने पर्यावरणीय प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी माझी वसुंधरा अभियान या राज्यव्यापी उपक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. जैविक शेती ही अभियान पुढच्या टप्प्यात राबविण्यात येणार असून नैसर्गिक शेतीचा अवलंब करून सुपीक जमीन, शुद्ध पाणी आणि शुद्ध हवेसाठी पर्यावरणरक्षणाचा संकल्प करण्याचे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले, ‘वसुधैव कुटुंबकम’ या सिद्धांतावर भारताचा दृढ विश्वास आहे. पर्यावरण रक्षण या सिद्धांताचाच एक भाग असून, या अभियानास स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मिळत असलेला प्रतिसाद नक्कीच कौतुकास्पद आहे. निसर्ग संपत्ती ही आपणास वारसा पद्धतीने पूर्वजांकडून ऋण स्वरूपात मिळाली आहे. ती सुस्थितीत पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे, ही आपली जबाबदारी आहे. पर्यावरण रक्षणाची जबाबदारी प्रत्येक नागरीकांची असून या पर्यावरण संवर्धन मोहिमेत प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने सहभाग नोंदवावा, असे आवाहन श्री. नार्वेकर यांनी केले.

या प्रसंगी माझी वसुंधरा अभियानावर आधारित माहितीपट सादर करण्यात आला. तसेच अभियानातील यशोगाथांवर आधारित “कॉफी टेबल बुक” आणि “द क्लायमेट चेंज लेक्सिकॉन” (मराठी-इंग्रजी पर्यावरण शब्दकोश) यांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचे पुरस्कार - ग्रामपंचायत (एकूण 18 स्थानिक संस्था), राज्यस्तरीय द्वितीय, तृतीय, उंच उडी आणि उत्तेजनार्थ पुरस्कार (एकूण ४५), राज्यस्तरीय द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार (एकूण 34 स्थानिक स्वराज्य संस्था) नगर परिषद व नगर पंचायत गट यांना पुरस्कारांनी संस्था आणि अधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### संतूरने खऱ्या चंदन लेपपासून बनवलेली अगरबत्ती लाँच केली

मुंबई (दैनिक संध्या) : विप्रो कन्स्युमर केअर अँड लाईटिंगचा प्रमुख ब्रँड असलेल्या संतूरने अगरबत्ती (धूपबत्ती) क्षेत्रात प्रवेश केला असून, संतूर अगरबत्ती लाँच केली आहे, जी खऱ्या चंदनाच्या लेपाचा वापर करून बनवली आहे. या लाँचद्वारे संतूरने घरातील वातावरण सुगंधित करण्याच्या (होम अँबियन्स) क्षेत्रात आपला विस्तार केला असून, चंदनावर आधारित उत्पादनांशी असलेल्या दीर्घकाळच्या विश्वासावर आधारित हा पुढचा टप्पा आहे. संतूर ब्रँड अनेक दशकांपासून आपल्या पर्सनल केअर उत्पादनांमध्ये चंदनाचा वापर करत आले आहे. या नवीन उत्पादनाच्या माध्यमातून, हा ब्रँड आपला तोच वारसा अगरबत्तीच्या क्षेत्रात पुढे नेत आहे, ज्यामध्ये मंदिरे आणि घरांमध्ये पारंपरिकपणे वापरल्या जाणाऱ्या खऱ्या चंदन लेपाचा मुख्य घटक म्हणून वापर करण्यात आला आहे. संतूर अगरबत्तीची रेंज तीन प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत: चंदन लेप, चंदन आणि मोगरा, चंदन आणि केसर. या सर्व अगरबत्त्या खऱ्या चंदनाच्या लेपापासून तयार करण्यात आल्या असून, त्या पारंपरिक आणि ओळखीचा सुगंध देतात या लाँचबद्दल बोलताना, विप्रो कंझ्युमर केअर अँड लाइटिंगच्या बिझनेस डेव्हलपमेंटचे जीएम उषासिस साहा यांनी सांगितले, "खऱ्या चंदन लेपपासून बनवलेली संतूर अगरबत्ती सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. प्रत्येक संतूर अगरबत्ती ही परंपरेचे प्रतीक आहे, जी शेकडो वर्षांपासून मंदिरे आणि घरांमध्ये दरवळणाऱ्या त्याच खऱ्या चंदन लेपाचा वापर करून ती तयार करण्यात आली आहे.” संतूर अगरबत्ती 125 ग्रॅमच्या झिपलॉक पॅकमध्ये आणि 20 ग्रॅमच्या पाऊच पॅकमध्ये स्थानिक किराणा दुकानांमध्ये उपलब्ध असेल, या श्रेणीत एकूण सात वेगवेगळे एसकेयू (SKU) असतील. या लाँचमुळे, संतूर एका नवीन श्रेणीत प्रवेश करत आहे, त्याचबरोबर अस्सलपणा आणि खऱ्या घटकांवर आधारित वेगळेपणा जपण्यावर संतूरने विशेष भर दिला आहे.

### अमनदीप सिद्धू म्हणाली, “त्यांची प्रेमकहाणी आता खऱ्या अर्थाने सुरु झाली आहे.”

मुंबई (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील ‘गंगा माई की बेटियाँ’ मालिकेत शिझान खान (सिद्धू) आणि अमनदीप सिद्धू (स्नेहा) प्रमुख भूमिकेत असून आगामी भागांमध्ये मालिकेत एक मोठा आणि खास क्षण प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. बराच काळ प्रेक्षक ज्याची आतुरतेने वाट पाहत होते, तो क्षण अखेर आला आहे—सिद्धू स्नेहापुढे आपल्या प्रेमाची कबुली देणार आहे. आणखी एक आश्चर्य म्हणजे स्नेहा त्याचे मनापासून केलेले प्रेमनिर्दर्शन तर ऐकतेच आणि त्याच्यावरचे आपले प्रेमही व्यक्त करते. आणि अशा प्रकारे #SneDhuची प्रेमकहाणी अधिकृतपणे सुरू होते. या प्रपोजलचा सीन किती सुंदररीत्या शूट केला गेला याबद्दल बोलताना अमनदीप म्हणाली, “महाशिवरात्रीच्या दिवशी सिद्धूने स्नेहाला प्रपोज केले. महाशिवरात्रीला भगवान शिव आणि पार्वती यांचा विवाह झाला असे मानले जाते आणि म्हणूनच या दिवशी स्नेहा आणि सिद्धू यांनी एकमेकांवरचे प्रेम व्यक्त करणे त्यांच्या कथेशी खूप सुंदरपणे जोडले जाते. सिद्धू आपले प्रेम व्यक्त करतो तेव्हा स्नेहा सुरुवातीला थक्क होते आणि तिने कधीच त्याला त्या नजरेने पाहिले नव्हते असे सांगते. पण नंतर तिला जाणवते की तीही त्याच्यावर प्रेम करते. हा सीन अतिशय सुंदर ठिकाणी शूट करण्यात आला आहे. हा सीन पूर्ण करण्यास आम्हांला चार दिवस लागले. आम्ही प्रथम हिमाचल प्रदेशला गेलो आणि नंतर पंजाबमध्ये शूट केले. रात्रीच्या शूटदरम्यान खूप थंडी होती पण हा एक खूप छान आणि संस्मरणीय अनुभव होता आणि त्याबद्दल मला खूप आनंद आहे.” खऱ्या आयुष्यात तिला असे भव्य प्रपोजल कधी मिळाले आहे का या प्रश्नावर अमनदीप हसत सांगते, “नाही, मी शिझानला म्हणत होते की मला कधीच असा अनुभव आला नाही. कोणीही मला इतक्या मोठ्या किंवा रोमँटिक पद्धतीने कधी प्रपोज केलेले नाही. आजकाल लोक असे प्रपोज करतच नाहीत असे मला वाटते. पण कदाचित कधीतरी कोणी असे केले तर मी ‘हो’ही म्हणेन... कोण जाणे!”

## २८ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी बंधुताचार्य प्रकाश रोकडे



बंधुताचार्य प्रकाश रोकडे | डॉ. मनीषा बोरा | प्रा. शरयू पवार

पुणे (दै. संध्या)

विश्वबंधुता साहित्य परिषद, भारतीय जैन संघटनेचे वाघोली येथील महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन पुणे या संस्थांच्या वतीने आयोजित २८ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांची निवड करण्यात आली आहे. १२ एप्रिल २०२६ रोजी नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात हे संमेलन होणार आहे. संमेलनाच्या कार्याध्यक्षपदी प्राचार्य डॉ. मनीषा बोरा, तर स्वागताध्यक्षपदी साहित्यिक प्रा. शरयू पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे यांनी दिली. प्रा. शंकर आथरे म्हणाले, "प्रकाश रोकडे यांनी गेल्या पाच दशकांपासून केलेल्या बंधुता, राष्ट्रबंधुता आणि विश्वबंधुता या अखंड कार्याचा, साहित्य आणि सांस्कृतिक सेवेचा हा सन्मान आहे. त्यांच्या 'अर्थशोध आणि बोध', 'मी पाण्याच्या जातीचा', 'आरपार बंधुता', 'बंधुतापर्व', 'प्रकाशपर्व' 'बंधुताचार्यांची प्रकाशगाथा' अशा साहित्यकृती प्रकाशित झालेल्या आहेत. राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन, रयत विचारवेध संमेलन आणि लोककवी वामनदादा कर्डक महाकाव्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. डॉ. मनीषा बोरा आणि प्रा. शरयू पवार यांनी शैक्षणिक क्षेत्रात मौलिक योगदान दिले असून, विविध विषयांवरील त्यांचे वैचारिक लेखनही प्रकाशित झाले आहे."

## भारतीय महिलांनी जिंकला आशिया चषक; महाराष्ट्राची पोरगी चमकली, बांगलादेशला मात दिली

पुणे (दै. संध्या) : भारतीय महिला संघाने Women's Asia Cup Rising Stars स्पर्धेच्या फायनलमध्ये बांगलादेशला पराभूत करून जेतेपदाची माळ गळ्यात पाडून घेतली. तेजल हसबनिसच्या अर्धशतकाच्या जोरावर भारतीय महिला संघाने बाजी मारली. प्रेमा रावतनेही गोलंदाजीत आपली छाप सोडली. भारतीय महिला संघाला चांगली सुरुवात करता आली नाही. ४ फलंदाज ४४ धावांत तंबूत परतल्यानंतर तेजल व कर्णधार राधा यादव ही जोडी मैदानावर उभी राहिली. राधा व तेजल यांनी ६९ धावा जोडल्या.

## कला, संस्कृती, परंपरा व नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन गरजेचे

### प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीतर्फे 'ल क्लासे' फॅशन शोचे आयोजन

पुणे (दै. संध्या)




सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीच्या (एसआयएफटी) वतीने आयोजित केलेल्या 'ल क्लासे' या वार्षिक फॅशन शोमधून 'शाश्वत भारत' संकल्पनेचे दर्शन घडले. 'शाश्वत भविष्याकरिता भारतीय संस्कृती, परंपरा, कला आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे ही प्रत्येक मानवाची प्राथमिक जबाबदारी आहे,' असे प्रतिपादन 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी केले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली 'एसआयएफटी'च्या प्राचार्या डॉ. सायली पांडे यांच्या पुढाकाराने 'शाश्वत भारत' या संकल्पनेवर आधारित यंदाचा फॅशन शो झाला. आधुनिक फॅशनच्या रूपात विद्यार्थ्यांनी सहजपणे भारताच्या सांस्कृतिक मुळांचा, पारंपरिक हस्तकलेचा आणि शाश्वत डिझाइन तत्त्वज्ञानाचा साकारलेला प्रभावी आविष्कार या फॅशन शोमध्ये सादर झाला. एकूण सहा वैशिष्ट्यपूर्ण सत्रांमधून फॅशनची ही कहाणी उलगडली. प्रत्येक सत्रामध्ये शाश्वतता, वारसा आणि जबाबदार डिझाइनचा वेध घेतला गेला.

उद्घाटनाच्या 'भूमी आणि तंतू - द सॉईल ऑफ द लँड' या सत्रामध्ये खादी, सेंद्रिय कापूस, भांग (हेम्प), लिनन आणि अहिंसा सिल्क यांसारख्या भारतातील पारंपरिक नैसर्गिक तंतूंना अभिवादन करण्यात आले. कमी पर्यावरणीय परिणाम करणारे साहित्य, नैसर्गिक पोत आणि श्वास घेणारी विण यांवर भर देत या संग्रहात प्रिंट्सपेक्षा कापडाच्या रचनेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. मृदू मातीसारखे रंग आणि ऑफ-व्हाईट छटा शुद्धता, अस्सलता आणि भूमी-डिझाइनमधील घट्ट नातेसंबंधाचे प्रतीक म्हणून उभ्या राहिल्या.

'सूर्यशक्ती' (सोलर स्पिंडल) या दुसऱ्या सत्रात सूर्याच्या शाश्वत ऊर्जेपासून आणि चरख्याच्या लयबद्ध हालचालीपासून प्रेरणा घेत, भारतीय तत्त्वज्ञानाशी निगडित या संग्रहाने सजीवपणा, हालचाल आणि नवचैतन्याचे दर्शन घडवले. प्रवाही सिलोएट्स, हस्तनिर्मित पोत आणि गतिमान पृष्ठभाग अलंकरणाच्या माध्यमातून जीवनशक्ती म्हणून ऊर्जेचा गौरव करण्यात आला.

'हस्तकला- द आर्ट ऑफ हॅन्ड्स'मधून भारताच्या समृद्ध हस्तकला परंपरेचा उत्सव साजरा झाला. ‘शाश्वत भारत’ या संकल्पनेचा वेध घेत या संग्रहात कलमकारीसारख्या पारंपरिक वस्त्रांसह भरतकाम, पेंटिंग आणि अरी (झरदोसी) यांसारख्या पारंपरिक अलंकरण तंत्रांना अधोरेखित करण्यात आले. स्ट्रक्चर्ड ब्लेझर्स आणि टेलर्ड ट्राउझर्समुळे आधुनिकता जाणवली, तर टील ग्रीन, मातीसारखे कलमकारी रंग, मेटॅलिक ॲक्सेंट्स आणि ऑफ-व्हाईट छटा सांस्कृतिक सातत्य आणि स्लो फॅशन मूल्यांना अधोरेखित केले. 'धरोहर' या चौथ्या सत्रांतून भारताच्या वस्त्रपरंपरेचे जतन आणि संवर्धन यावर केंद्रित होते. पैठणी, बनारसी, महेश्वरी, कांचीवरम, पटोला आणि ब्रोकेड्स यांसारख्या पारंपरिक हातमाग वस्त्रांना आधुनिक सिलोएट्सद्वारे नव्या रूपात सादर करण्यात आले. मुघल ग्रीन, लाल, आयव्हरी, सोनेरी, विटकरी लाल आणि जांभळ्या अशा समृद्ध रंगछटांच्या वापरातून या संग्रहाने वारसा आणि शाश्वतता यांची सांगड घातली.

निसर्गप्रेरित कथनातून वस्त्र रंगवण्याच्या कलेचा उत्सव असलेल्या पाचव्या 'रंगरेज' या सत्रात टाय-अँड-डाय, शिबोरी आणि बटिक यांसारख्या पारंपरिक रंगकाम तंत्रांना नैसर्गिक व सेंद्रिय रंगांच्या माध्यमातून पुनरुज्जीवित करत या संग्रहाने परिवर्तन, संतुलन आणि सहअस्तित्वाचे प्रतीक साकारले. सिलोएट्स आणि हस्तनिर्मित प्रक्रियांद्वारे ‘रंगरेज’ने पर्यावरणीय जबाबदारी आणि निसर्गाशी सुसंवादाचा प्रभावी संदेश दिला.

'मिट्टी अँड मोअर' या समारोपाच्या सत्रात भारतीय मातीचा गाभा आणि मुळांशी असलेली भावनिक नाळ प्रतिबिंबित झाली. कापूस, लिनन आणि उरलेल्या कापडांचा वापर करून या संग्रहाने पुनर्वापर, कमी कचरा आणि योग्य विनियोग यांना प्रोत्साहन दिले.

## कांदा, बटाटा व गाजराची विक्रमी आवक; पालेभाज्यांचे भाव कडाडले

### एकूण उलाढाल ६ कोटी, ७० लाख रुपये

चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये कांदा, बटाटा, वाटाणा व गाजराची विक्रमी आवक झाली. हिरवी मिरची, चवळी व कोबी आणि फ्लावरचे भाव तेजीत राहिले. लसणाची प्रचंड आवक झाली. येथील पालेभाज्यांच्या बाजारात पालक, कोथिंबीर व मेथीची भरपूर आवक झाल्याने भाव कोसळले. एकूण उलाढाल ६ कोटी ७० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण ९ हजार क्विंटल आवक झाली. कांद्याला कमाल भाव १,५०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. बटाट्याला १,२०० रुपयांपर्यंत भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक २८० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ६ हजार रुपयांपासून ते ७,००० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे :

कांदा - एकूण आवक - ९,००० क्विंटल.भाव क्रमांक - १.१५०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३. १,०००.

बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल, भाव क्रमांक १. १,२००,. भाव क्रमांक २. १,००० रुपये,. भाव क्रमांक ३. ८०० रुपये,.



फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटल मध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३३२ क्विंटल (८०० ते १,००० रू.), कोबी - २२० क्विंटल (४०० ते ५०० रू.), फ्लॉवर - १९० क्विंटल (१,००० ते १,२०० रु.), वांगी - ६८ क्विंटल (२,००० ते २,५०० रु.), भेंडी - ७५ क्विंटल (३,००० ते ३,५०० रु.), दोडका - ४८ क्विंटल (४,००० ते ४,५०० रु.), कारली - ७६ क्विंटल ( ३,००० ते ३,५०० रू.) दुधीभोपळा - ५२ क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), काकडी - ११२ क्विंटल (८०० ते १,००० रु.),फरशी - ५० क्विंटल (१,५०० ते २,००० रु.), वालवड - ७४ क्विंटल (१,००० ते १,५०० रुपये), ढोबळी मिरची - १५६ क्विंटल (३,००० ते ३,५०० रु.), चवळी - ३४ क्विंटल (२,००० ते २,५०० रु.), वाटाणा - ३३० क्विंटल (२,२०० ते २,४०० रू. ), गाजर - १७० क्विंटल (१,००० ते १,३०० रु.), गवार - २७ क्विंटल ७,००० ते ८,००० रु. ), आद्रक - १५५ क्विंटल ( ३,५०० ते ४,००० रु. )....

पालेभाज्या : चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण १७ हजार ९९० जुड्या (८०० ते १,३११ रुपये ), कोथिंबीर - एकूण ३४ हजार ३५० जुड्या (८०० ते १,३३० रुपये,), शेपू - एकूण ३ हजार ५७० जुड्या (५०० ते १,२०० रुपये ), पालक - एकूण ३ हजार ५२८ जुड्या (५०० ते ८०० रुपये),

जनावरे : चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ३५ जर्सी गाईंपैकी २८ गाईंची विक्री झाली.

(१५,००० ते ७०,००० रु. ), ८५ बैलांपैकी ६० बैलांची विक्री झाली. ( १०,००० ते ४०,००० रु.), ११० म्हशीं पैकी ९५ म्हशींची विक्री झाली. ( ३०,००० ते ८०,००० रु.), ९,६०० शेळ्यामेंढ्यापैकी ८ हजार ८०० शेळ्यांची विक्री झाली असून त्यांना २,००० रुपयांपासून ते १५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सासवडचे ग्रामदैवत काळभैरवनाथ मंदिर पुजाऱ्यांनी ठेवले बंद


■ जमिनीच्या उत्पन्नावरून वाद पेटला

सासवड (दैनिक संध्या) : सासवडचे आराध्य दैवत श्री काळभैरवनाथ मंदिराचे दरवाजे शनिवारी पुजाऱ्यांनी बंद ठेवून निषेध व्यक्त केला. गेल्या तीन पिढ्यांपासून देवाची सेवा करणाऱ्या पुजारी कुटुंबाला देवस्थानच्या जमिनीतून मिळणाऱ्या हक्काच्या उत्पन्नापासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करत, हा पवित्रा घेण्यात आला. या आंदोलनाला काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्टनेही खंबीर पाठिंबा दिला आहे. भैरवकर कुटुंब पिढ्यानपिढ्या मंदिराची पूजा-अर्चा आणि स्वच्छता पाहते. ऐतिहासिक काळात सरदारांनी पुजाऱ्यांच्या उदरनिर्वाहासाठी देवस्थानच्या जमिनी दिल्या होत्या. नियमानुसार, या जमिनीतील उत्पन्नाचा अर्धा हिस्सा पुजाऱ्यांना मिळणे अपेक्षित आहे. मात्र, सध्या या जमिनी कसणाऱ्यांकडून पुजाऱ्यांना आर्थिक किंवा धान्य स्वरूपात कोणताही मोबदला दिला जात नसल्याची तक्रार आहे. नुकताच या जमिनीतील ऊस साखर कारखान्याने तोडून नेल्याने पुजाऱ्यांच्या उपजीविकेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. साखर कारखान्याने उसाची रक्कम देवस्थानच्या खात्यात जमा करावी, असे निवेदन ट्रस्टने दिले होते. मात्र, ऊस नेल्यानंतरही पुजाऱ्यांच्या पदरी निराशाच पडल्याने त्यांनी 'देऊळ बंद'चा निर्णय घेतला. यावेळी काळभैरवनाथ ट्रस्टचे अध्यक्ष रमेश जगताप, उपाध्यक्ष पांडुरंग भोंगळे, अण्णा शिरसागर, पै. प्रकाश जगताप, गाव पाटील संग्राम जगताप यांच्यासह बाजीराव इनामके, राजेंद्र भैरवकर, रामभाऊ इनामके, गणेश भैरवकर, मोहन जगताप, उत्तम जगताप, जयसिंग जगताप, गुलाब चवळे, सुरेश जगताप, रवींद्रपंत जगताप, अनिल लांडगे, सुधाकर गिरमे, आनंद जगताप, राजाभाऊ जगताप, बाजीराव इनामके आणि पुजारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### कै. सौ. शालन उत्तमराव भोंडवे यांचे निधन

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : हवेली तालुक्यातील लोणीकंद येथील संत समाज विचार प्रसार प्रबोधन केंद्राचे संस्थापक ह.भ.प. उत्तम भोंडवे यांच्या सौभाग्यवती कै.सौ.शालन उत्तम भोंडवे यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ७२ व्या वर्षी दुखःद निधन झाले. त्याच्या पश्चात पती, तिन मुले, सुना, दोन बहिणी, तीन भाऊ, नातवंडे असा मोठा परिवार आहे. भाजपा क्रिडा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष पै.संदिप भोंडवे, उद्योजक ज्ञानेश्वर भोंडवे, सचिन भोंडवे यांची मातोश्री आहे.



### चाकण येथे ज्ञानवर्धिनी विद्यालयात आई-वडिलांचा सन्मान

चाकण (दैनिक संध्या) : स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कुल आणि स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज चाकण येथे मातृ पितृ पुजन दिनाचे औचित्य साधून आई-वडिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रतिमा पुजन गुरुवर्य राजू दिक्षित यांनी केले. यावेळी नगराध्यक्षा मनिषा गोरे, किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष एड. किरण झिंजुरके, माजी चेअरमन रामचंद्र गोरे, उद्योजक किशोर परदेशी, भानुदास डोंगरे, पुराणिक काका, संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, केंद्रप्रमुख मंजुषा पोखरकर, आदर्श माता ताराबाई गोरे, समाजसेविका अनिता गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिंसिपल माधुरी गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, पर्यवेक्षक प्रेरणा काळे, विभाग प्रमुख दत्तात्रय लिंभोरे आदी उपस्थित होते. यावेळी आई - वडिलांप्रती मुलांनी मनोगत, नाट्य छटा, समूह गीते सादर केली. विकास गोरे यांनी माता - पिता यांचे विधिवत पुजन केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. पालकांनी यावेळी शाळेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. गुरुवर्य राजेंद्र दीक्षित यांनी यावेळी माता पिता पुजन या कार्यक्रमाचे आयोजन करून प्रशाला शालेय शिक्षणाबरोबर मूल्यवर्धन, संस्कारक्षम, अध्यात्मिक बाबीची सांगड घालून नवीन पिढी घडविण्याचे कार्य या माध्यमातून निर्माण करत असल्याचे सांगितले. एड. किरण झिंजुरके यांनी यावेळी चाकण परिसरातील दर्जेदार, संस्कारक्षम शिक्षण देणाऱ्या स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे या शैक्षणिक संस्थेचे कौतुक केले.विकास गोरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. दत्तात्रय लिंभोरे यांनी प्रास्ताविक केले. सुनिल वडेकर यांनी सूत्रसंचालन, तर प्रेरणा काळे यांनी आभार मानले.

# माझी वसुंधरा अभियानात सासवड नगरपरिषदेचा राज्यात गौरव

**सासवड (दै. संध्या)**



सासवड नगरपरिषदेने स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात पुन्हा एकदा राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. मागील वर्षीच्या 'माझी वसुंधरा अभियान ४.०' अंतर्गत २५ ते ५० हजार लोकसंख्या गटात सासवड नगरपरिषदेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला असून, शनिवारी (ता. २१) मुंबईत झालेल्या दिमाखदार सोहळ्यात या गौरवावर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले. पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते सासवड नगरपरिषदेला हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गतवर्षीच्या या अभियानात राज्यातील तब्बल २२ हजार ६३२ स्थानिक स्वराज्य संस्था सहभागी झाल्या होत्या. या चुरशीच्या स्पर्धेत सासवडने आपल्या उत्कृष्ट नियोजनाच्या जोरावर ३ कोटी रुपयांचे रोख बक्षीस आणि सन्मानचिन्ह प्राप्त केले आहे. मागील वर्षी प्रशासकीय राजवट असल्याने या पुरस्कारांचे वितरण यावर्षी मोठ्या उत्साहात पार पडले.

मुंबईतील या गौरव सोहळ्याला माजी आमदार संजय जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप यांसह नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर गिरमे, सोपान रणपिसे, मयूर चौखंडे, नगरसेविका प्रियांका जगताप, लिना वढणे, स्मिता जगताप, अर्चना जगताप, माजी उपनगराध्यक्ष सुहास लांडगे, विजय वढणे, संदीप राऊत, साकेत जगताप, सौरभ वढणे, सुहास जगताप, तुषार जगताप, हिरामण हिवरकर आणि शहर स्वच्छता समन्वयक राम कारंडे यांनी उपस्थित राहून सासवडचा हा बहुमान स्वीकारला.

सासवड नगरपरिषदेने गेल्या काही वर्षांत राबविलेले अभिनव उपक्रम या यशाचे मुख्य कारण ठरले आहेत. शहरात केलेले मोठ्या प्रमाणावरील वृक्षारोपण, शास्त्रशुद्ध कचरा व्यवस्थापन आणि सौर ऊर्जेचा प्रभावी वापर या त्रिसूत्रीमुळे सासवडने राज्य स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. या यशामुळे संपूर्ण पुरंदर तालुक्यातून नगरपरिषदेचे कौतुक होत आहे.

# कॉस्ट अकाउंटंट्सनी कुशल, तज्ज्ञ होण्यास प्राधान्य द्यावे

### डॉ. पराग काळकर यांचे प्रतिपादन; 'आयसीएमएआय'च्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पुणे (दै. संध्या)**



कॉस्ट अकाउंटंट्स हे आव्हानात्मक आणि देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारे क्षेत्र आहे. त्यामुळे नीतिमूल्याची जपणूक करीत विषयाचे सखोल ज्ञान घेत या क्षेत्रातील 'तज्ज्ञ' होण्यास प्राधान्य द्यावे," असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंट्स ऑफ इंडिया (आयसीएमआय) पुणे चॅप्टरतर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात डॉ. काळकर बोलत होते. कर्वेनगर येथील सीएमए भवनात झालेल्या समारंभावेळी जीएसटी सहआयुक्त सीएमए संजाली डायस, 'आयसीएमआय'चे उपाध्यक्ष सीएमए नीरज जोशी, विभागीय समिती सदस्य सीएमए चैतन्य मोहरीर, सीमए डॉ. संजय भार्गवे, पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए श्रीकांत ईप्पलपल्ली, उपाध्यक्ष सीएमए राहुल चिंचोळकर, स्टुडेंट कोऑर्डीनेशन कमिटीचे चेअरमन सीएमए अमेय टिकले, खजिनदार सीएमए तनुजा मंत्रवादी, सीएमए हिमांशू दवे, अनुजा दाभाडे आदी उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात गरवारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसरडा, सीएमए हनुमंत जमदाडे व सीएस कल्याणी शिरोडे यांनी मार्गदर्शन केले. सीएमए सौमित्र बावठाणकर स्मरणार्थ उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना, तर पीसीसीए आर्ट सर्कल व संदीप जोशी परिवाराच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. डॉ. पराग काळकर म्हणाले, "सीएमए विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळवून थांबू नये. कृत्रिम बुद्धिमता, नाविन्यता, नवनवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आत्मसात केले, तर तुम्हाला असंख्य संधींची दारे खुली आहेत. तंत्रज्ञान आणि एआयमुळे मूलभूत कामे यंत्रांद्वारे होत असली, तरी निर्णयक्षमता ही माणसाचीच ताकद आहे. व्यावसायिक आयुष्यात सतत रिस्किलिंग आणि अपस्किलिंग करत राहा. देशातील पायाभूत सुविधा, वित्त, प्रकल्प व्यवस्थापन आणि शाश्वत विकास यांसारख्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत असून, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा."

सीएमए संजाली डायस यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही नोकऱ्या कमी करणारी नव्हे, तर नव्या संधी निर्माण करणारी परिवर्तनशील शक्ती असल्याचे स्पष्ट केले. जागतिक स्तरावर एआयमुळे रोजगारांबाबत मिश्र चित्र दिसत असले, तरी स्वतःला सतत अद्ययावत ठेवणारे, नवे कौशल्य आत्मसात करणारे आणि बदल स्वीकारणारे व्यावसायिक भविष्यात अधिक यशस्वी ठरतील. मानवी संवेदनशीलता, समजूतदारपणा आणि विश्लेषणक्षम विचारशक्ती हीच खरी व्यावसायिकांची ताकद असते, असे त्यांनी सांगितले. सीएमए नीरज जोशी म्हणाले, "सीएमए प्रोफेशनल्स म्हणून काम सुरु केले, तरी विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून सतत शिकत राहावे. संस्थेशी जोडून घ्यावे. त्यातून या व्यवसायातील नवनवीन गोष्टी शिकण्यास मदत होते. वरिष्ठांच्या अनुभवातून या क्षेत्राचे वेगळे पैलू समजतात. सेवा क्षेत्रात सीएमएना मोठी मागणी होत आहे. त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या मोठ्या संधींचा लाभ घेण्यासाठी देश-परदेशात, नोकरी-व्यवसायात जाण्याची तयारी ठेवावी."

सीएमए चैतन्य मोहरीर व डॉ. संजय भार्गवे यांनीही मार्गदर्शन केले. सीएमए श्रीकांत ईप्पलपल्ली यांनी 'आयसीएमएआय'च्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. सीएमए अमेय टिकले यांनी प्रास्ताविक केले. सीएमए राहुल चिंचोळकर यांनी स्वागत-परीचय करून दिला. तन्वी वैद्य, वैष्णवी जोशी व प्राची भुतडा यांनी सूत्रसंचालन केले.




'एआय समिट'मध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांच्या अटकेच्या निषेधार्थ

## पुणे जिल्हा-शहर युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन

**पुणे (दै. संध्या)**

नवी दिल्ली येथे आयोजित एआय समिटमध्ये शांततेत आंदोलन करणाऱ्या भारतीय युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसह अध्यक्ष उदय भानू चिब यांच्या अटकेच्या निषेधार्थ पुणे जिल्हा शहर युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. गुडलक चौकात झालेल्या आंदोलनावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत भारतीय जनता पार्टी व पोलीस प्रशासनाचा निषेध करण्यात आला. दरम्यान, आक्रमक झालेल्या युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

युवक काँग्रेसच्या प्रदेश प्रभारी शांभवी शुक्ल, प्रदेश सरचिटणीस प्रथमेश आबनावे, पुणे शहर युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष सौरभ अमराळे, पुणे जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष उमेश पवार यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रथमेश आबनावे म्हणाले, "भाजपकडून लोकशाही दाबण्याचे काम सुरु आहे. पंतप्रधान मोदी एप्सटिन फाईलवर बोलत नाहीत; माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या पुस्तकावर बोलत नाहीत. देशाची सुरक्षा आणि हित या दृष्टीने मोदी यांचे मौन गंभीर बाब आहे." उमेश पवार यांनी सांगितले की, युवक काँग्रेसच्या अध्यक्षांसह पदाधिकाऱ्यांवर केलेली कारवाई निषेधार्ह आहे. आम्ही भाजप सरकारचा निषेध व्यक्त करण्यासाठी इथे आंदोलन करत आहोत. काल ज्या पद्धतीने आमचे नेते उदय भानू चिब यांना कार्यालयात जाऊन अटक करण्यात आली, ते खूपच निषेधार्थ आहे.

सौरभ अमराळे म्हणाले, "पोलिसांचे बळ वापरून न्यायासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांना चिरडण्याचा प्रयत्न सुरु आहे. परंतु, युवक कॉंग्रेस हा अन्याय सहन करणार नाही. देशासाठी, न्यायासाठी आमचा लढा कायम सुरु राहील."

## सिक्कीमच्या दीक्षांत समारंभासाठी डॉ. मेहबूब सैय्यद यांना निमंत्रण

**चाकण (दै. संध्या)**

टॅलेंटकॉर्प सोल्यूशन्सचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मेहबूब सैय्यद यांना मेधावी स्किल्स युनिव्हर्सिटी, सिक्कीम यांच्या द्वितीय दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. सिक्कीम येथे हा दीक्षांत समारंभ बुधवारी (दि.२५) सकाळी दहा वाजता मनन केंद्र, गंगटोक येथे आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. प्रवेश दुदानी, उपकुलगुरू डॉ. सजीव कुमार यांच्या वतीने सैय्यद यांना निमंत्रण देण्यात आले आहे. मेधावी स्किल्स युनिव्हर्सिटी सिक्कीम ही संस्था सन २०२१ मध्ये सिक्कीम राज्य विधिमंडळाच्या कायद्यानुसार स्थापन झाली आहे. पूर्व व ईशान्य भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य संस्थांपैकी एक नावजलेली संस्था म्हणून ही संस्था उदयास आली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या २०२० नुसार उच्च शिक्षण व कौशल्य विकास यांचे एकत्रीकरण करण्यावर विद्यापीठाचा विशेष भर आहे. तसेच विद्यापीठाला युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन व नॅशनल कौन्सिल फॉर व्होकेशनल एज्युकेशन अँड ट्रेनिंग भारत सरकार यांची मान्यता प्राप्त आहे. उद्योग व शिक्षण क्षेत्रातील भक्कम सहकार्याच्या माध्यमातून अभ्यासक्रम रचना, प्रशिक्षण, अप्रेंटिसशिप आणि ऑन-द-जॉब प्रशिक्षण यामध्ये उद्योगांचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगसिद्ध कौशल्ये प्राप्त होऊन ते रोजगारक्षम बनत आहेत.

## ओझर येथे कायदेविषयक योजना व सेवांचा महामेळाव्याचे आयोजन

**पुणे (दै. संध्या)**

"जुन्नर, आंबेगाव, (खेड) राजगुरुनगर व शिरुर तालुक्यातील दुर्गम अतिदुर्गम आणि ग्रामीण भागातील वस्त्यांपर्यंत शासनाच्या सेवा पोहोचाव्या हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असून यामुळे आदिवासी, दिव्यांग,जेष्ठ नागरिक,बांधकाम, उसतोड कामगार महिला, मुले आणि सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अनेक कुटुंबांना त्यांच्या हक्कांविषयी योजनेचा लाभ घेण्याचा मार्ग सुलभ होईल". !
**- श्री. एस- बी- शेलार, जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व अति- सत्र न्यायालय जुन्नर तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती जुन्नर**

दि. २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय मुंबई यांच्या वतीने श्री. क्षेत्र ओझर विघ्नहर गणपती देवस्थान ता. जुन्नर येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पुणे, तालुका विधी सेवा समिती जुन्नर व तालुका बार असोसिएशन जुन्नर मार्फत शासकीय योजनांचा व कायदेविषयक सेवांचा महामेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात पुणे जिल्हयातील जुन्नर, आंबेगाव, (खेड) राजगुरुनगर आणि शिरुर तालुक्यातील आदिवासी, दिव्यांग,जेष्ठ नागरिक,बांधकाम,उसतोड कामगार, महिला, मुले व सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थीसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा तसेच कायदेविषयक हक्कांविषयी जागरुकता निर्माण व्हावी. या उद्देशाने मार्गदर्शन व सहकार्य करण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या महा मेळाव्यास उपस्थितीत राहून शासकीय योजनांचा व कायदेविषयक सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. एस.बी. शेलार, जिल्हा न्यायाधीश ,जिल्हा व अति- सत्र न्यायालय जुन्नर तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे. मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय मुंबई व मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली होणारा हा उपक्रम पुणे जिल्हयातील जुन्नर, आंबेगाव ,(खेड)राजगुरुनगर व शिरुर तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी आयोजित केला असून जिल्हयातील हा सर्वात मोठा शासकीय योजनांचा व कायदेविषयक सेवांचा महामेळावा ठरणार आहे या महामेळाव्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे सन्माननीय न्यायमुर्ती तसेच पुणे जिल्हयाच्या पालक सन्माननीय न्यायमूर्तींची विशेष उपस्थिती असणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे दुर्गम, अतिदुर्गम, व ग्रामीण भागातील जनतेसाठी विधी सेवेचे दरवाजे खुले होऊन, विधिसेवा अधिक सुलभ होणार आहे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महामेळाव्यादरम्यान विविध शासकीय योजना हक्क व संदर्भिय लाभाची सविस्तर माहिती नागरिकांना दिली जाणार आहे. तसेच विविध विभागांचे अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहून पात्र लाभार्थ्यांसाठी नोंदणी,दस्तऐवज पडताळणी आणि अर्ज प्रक्रिया सुलभ करणार आहेत.व शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा यासंबंधी तज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे.

# चाकणला अपर तहसील कार्यालय दृष्टीक्षेपात असल्याने १९० गावांचे विभाजन होणार

**चाकण (दै. संध्या)**

प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणि पारदर्शकपणा आणण्यासाठी आणि नागरिकांची कामे जलद गतीने व्हावीत, यासाठी राज्यात ११ नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालये आणि ६९ अतिरक्त तहसीलदार कार्यालयांची निर्मिती केली जाणार आहे. त्यामध्ये चाकण अपर तहसील कार्यालयाचा समावेश असल्याने खेड तालुक्यातील १९० गावांचे विभाजन होणार आहे. खेड तहसील अंतर्गत खेड तालुक्यात सुमारे १९० गावे आहेत. त्यांचे विभाजन करण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली होती. त्यानुसार खेड तहसीलदार यांच्याकडे ११७ व अपर तहसीलदार चाकण पद निर्मिती करून त्यांच्याकडे ७३ गावे आणि या गावांबाबत अन्य भूमी अभिलेख व पुरवठा विभाग प्रशासकीय विभाग करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली होती. चाकण परिसरात आता औद्योगिक व नागरी क्षेत्र असून त्यांना चाकण शहर शासकीय कामासाठी आणि सुलभ ठरणार आहे. पुणे जिल्ह्याचा वाढता विस्तार आणि प्रशासकीय यंत्रणेवरील वाढता ताण पाहता जिल्ह्यातील २ प्रस्तावाला शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

“चाकणला अपर तहसील कार्यालय दृष्टिक्षेपात आहे ही बाब कौतुकास्पद असून, स्थानिकांच्या मागणी व पाठपुराव्याला प्रचंड यश आले आहे. या धाडसी निर्णयामुळे चाकण पंचक्रोशीतील नागरिकांना राजगुरुनगर येथील तालुका मुख्यालयापर्यंत जाण्यासाठी करावी लागणारी पायपीट कमी होणार आहे. चाकणमध्ये अपर तहसील कार्यालय व्हावे, यासाठी मागणी करणाऱ्या आणि पाठपुरावा करणाऱ्यांचे कौतुक करण्याची गरज आहे.” **- दीपक ताटे, पक्षप्रमुख, भापसे पार्टी**

चाकणला अपर तहसील कार्यालय होणार असल्याने खेड तालुक्यातील विद्यमान तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्याकडे असलेल्या १९० गावांचे लवकरच विभाजन होणार आहे. उत्तर पुणे जिल्ह्यात आंबेगाव येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयाचा देखील प्रस्ताव होता. मात्र त्याऐवजी चाकण येथे अपर तहसील कार्यालय स्थापन करण्यास शासनाने अनुकूलता दर्शविल्याचे महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी स्पष्ट सांगितले. नवीन कार्यालयांची निर्मिती करताना सरकारने काही विशिष्ट निकष लावले आहेत. यामध्ये संबंधित क्षेत्रातील संख्या, एकूण लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रफळ, आदिवासी आणि दुर्गम भागातील जनतेची गरज यांचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे.

जिल्हा मुख्यालयापासून प्रास्तावित कार्यालयाचे अंतर आणि तालुक्यातील सर्वात दूरच्या गावाची स्थिती लक्षात घेऊन हे निर्णय घेण्यात येत आहेत. अतिरिक्त तहसीलदार कार्यालयांसाठी महसूल मंडळाची संख्या आणि गावांमधील अंतर यावर भर देण्यात आला आहे. या निर्णयामुळे चाकण परिसरातील नागरिकांना राजगुरुनगर येथील तालुका मुख्यालयापर्यंत जाण्यासाठी करावी लागणारी पायपीट कमी होणार आहे. हवेली तालुका प्रशासकीय विभाजन झाले त्याच धर्तीवर खेड तालुक्यातील प्रशासकीय विभाजन करून अपर तहसीलदार, चाकण पदनिर्मिती करण्याची मागणी होती. त्यांच्याकडे चाकण, शेलपिंपळगाव, आळंदी, पाईटसह राजगुरुनगर मंडल पैकी प्रशासकीय व भौगोलिक परिस्थितीचा विचार करता वाकी बुद्रुक सजा अंतर्गत एकूण ७३ महसुली गावे वर्ग करून त्या क्षेत्रासाठी उपअधीक्षक, खेड व पुरवठा विभाग देखील विभाजन करण्याची मागणी करण्यात आली होती. यासाठी राज्य शासन, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार बाबाजी काळे यांच्याकडे पाठपुरावा सुरू होता, असे जिल्हा काँग्रेसचे प्रवक्ते ॲड. निलेश कड यांनी सांगितले. तसेच शासनातील विविध मंत्र्यांकडे यासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचे चाकण गावचे माजी उपसरपंच कालिदास वाडेकर यांनी सांगितले.